MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा



वर्ष तेविसावे/अंक ६/जून २०२२

## संपादकीय

### बदलते पालकत्व

जून महिन्याच्या १ तारखेला 'जागतिक पालक दिवस' साजरा करण्यात आला. पालकत्व हे आपोआप मिळते. त्याची जबाबदारीदेखील सहजच पेलली जाते. आपली बौद्धिक पातळी आणि आर्थिक परिस्थिती यांचा विचार करून आपण आपल्या मुलांना घडविण्याचा प्रयत्न करतो. परंतु सखोल विचार केल्यावर असे लक्षात येते की, पालकत्व ही मोठी जबाबदारी आहे. ती सहज होणारी बाब नाही. आपण आपल्या मुलांना ज्या पद्धतीने घडवितो त्यावर त्यांचे, आपल्या समाजाचे आणि पर्यायाने देशाचे भवितव्य अवलंबून असते. त्यामुळे पालकत्वाची जबाबदारी अतिशय काळजीपूर्वक घेणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने विचार करता पालकत्व ही जागतिक स्तरावर काळजी घेण्याचीच बाब आहे हे पटते.

प्रत्येक मूल वेगळे असते. त्याची बौद्धिक पातळी, त्याची आवडनिवड, त्याच्या क्षमता वेगवेगळ्या असतात. त्यानुसार शिक्षणाचा मार्ग आणि व्यवसायाची दिशा ठरवावी लागते. असे न करता बऱ्याचदा त्यांना आपल्या आवडीच्या क्षेत्रात ढकलले जाते. ज्या व्यवसायाला समाजात प्रतिष्ठा आहे, अशा व्यवसायाकडे मुले मोठ्या संख्येने जाताना आढळतात. त्यात ते स्थिरस्थावर होतीलही, पण नवनिर्मिती करण्याची क्षमता त्यांच्यात येत नाही. ते सांगकामे होतात. अशा मनुष्यबळावर समाजाची आणि देशाची म्हणावी तशी प्रगती होत नाही. विज्ञान क्षेत्रात अशी अनेक उदाहरणे आहेत की, जिथे पालकांनी आपल्या पाल्याची आवडनिवड पाहून योग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या त्यामुळे त्यांची चांगली प्रगती झाली.

पहिले उदाहरण आहे ते चार्ल्स डार्विन यांचे. आपल्या मुलाने डॉक्टर व्हावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती. त्यानुसार त्यांनी आपल्या मुलाला एडिनबरा येथील वैद्यकीय महाविद्यालयात शिकायला पाठवले. परंतु चार्ल्सची आवड मात्र वेगळी होती. वैद्यकीय शिक्षणापेक्षा पुरातन वस्तूंमध्ये त्यांचे मन रमते हे त्यांच्या वडिलांच्या लक्षात आल्यावर त्यांनी आपल्या मुलाला वैद्यकीय महाविद्यालयातून काढले आणि केंब्रिज येथील एका महाविद्यालयात घातले. या शहरात अनेक उत्कृष्ट वस्तुसंग्रहालये आहेत. त्यांचा त्यांनी चांगला उपयोग करून घेतला. त्यामुळे बिगल

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

जहाजावर जाणाऱ्या चमूत त्यांचा समावेश केला. त्या संधीचे त्याने सोने केले. आपल्या प्रदीर्घ प्रवासात मिळालेल्या अनेक वस्तू त्यांनी गोळा केल्या. त्यांचा सखोल अभ्यास करून जीवशास्त्रातील एक महत्त्वाचा सिद्धांत त्यांनी मांडला.

उत्तम पालकत्वाचे दुसरे उदाहरण आहे अमेरिकेतील थॉमस अल्वा एडिसन यांच्या आईचे. शालेय शिक्षण घेण्यासाठी तुमचा मुलगा असमर्थ आहे असे मत त्याच्या शिक्षकांनी मांडले. त्यामुळे निराश न होता त्या माईने मुलाला घरी लिहायला, वाचायला शिकविले. पुस्तकी माहिती लक्षात ठेवण्याऐवजी वेगवेगळे प्रयोग करून नवनवीन माहिती मिळविणे त्याला आवडत असे. त्यांच्या या आवडीला उत्तेजन म्हणून मुलाला वेगवेगळे प्रयोग करायला तिने प्रोत्साहन दिले. त्याचा परिणाम असा झाला की, जगाला एक उत्तम तंत्रज्ञ मिळाला. त्यांनी अनेक यंत्रे बनवली.

या संदर्भातील तिसरे उदाहरण भारतातले आहे. जगदीशचंद्र बोस यांना लहानपणापासून वनस्पती आणि प्राण्यांचे वेड होते. त्यांची ही निसर्गाची आवड जोपासण्यासाठी त्यांच्या वडिलांनी घरापुढे बाग विकसित केली. तिथे लहानसे डबके तयार करून त्यात जलचर प्राणी सोडले. त्याचबरोबर प्राणी आणि वनस्पती यांचे संगोपन करण्यास प्रोत्साहन दिले. या सगळ्यांचे बारकाईने निरीक्षण करून बाळ जगदीशने भरपूर माहिती मिळवली. यातूनच त्यांचे वनस्पतीवरचे प्रेम वृद्धिंगत झाले आणि भारताला एक महान वनस्पती शास्त्रज्ञ मिळाला.

युरोपात जेव्हा पहिली औद्योगिक क्रांती झाली, तेव्हा त्यांना विशिष्ट कौशल्ये असलेल्या माणसांची गरज पडू लागली. ती पूर्ण करण्यासाठी शिक्षणप्रणाली विकसित करण्यात आली. तीच प्रणाली इंग्रजी राजवटीत भारतात आली. ते गेल्यावर आपण शिक्षणप्रणालीत काही जुजबी बदल केले. परंतु मूळचा ढाचा तसाच राहिला. समाजाची आणि देशाची गरज बदलली. आजच्या समाजाच्या गरजा आधीच्या गरजांहून भिन्न आहेत. या गरजा पूर्ण करण्यासाठी जे मनुष्यबळ पाहिजे, ते शाळेच्या चार भिंतीत विकसित होणारे नाही. दोन वर्षांपूर्वी केंद्र सरकारने नवीन शैक्षणिक धोरण स्वीकारले आहे. यात शालेय आणि महाविद्यालयीन अध्यापनात अनेक बदल सुचवले आहेत. त्यांचा अवलंब केल्याने २१ व्या शतकाच्या समस्या सोडवण्यासाठी मनुष्यबळ मिळेल असे म्हणणे धारिष्ट्याचे ठरेल. आपण आपल्या देशाला आत्मनिर्भर बनविण्याचे स्वप्न पाहात आहोत. त्यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ विकसित करावयाचे असेल, तर शालेय शिक्षणाला योग्य त्या शाळाबाह्य कृतींची जोड देणे आवश्यक आहे. या संदर्भात पालकांचे कार्य अतिशय महत्त्वाचे आहे.

केवळ पुस्तकी माहितीने मुलांचे व्यक्तिमत्त्व घडत नाही. मूल कोणाच्या संपर्कात येते, कोणती अवांतर पुस्तके वाचते, फावल्या वेळेचा कसा उपयोग करून घेते याचा त्याच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पडत असतो. या सगळ्या बाबींवर पालकांनी लक्ष ठेवायचे आहे. आपल्या पाल्याला एखाद्या चांगल्या शाळेत घातले आणि नावाजलेल्या कोचिंग क्लासमध्ये प्रवेश घेऊन दिला की आपली

(पृष्ठ क्र.४० वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष तेविसावे/अंक ६/जून २०२२

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २६ वे/अंक १२ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | हिंदू साम्राज्य दिवस | नरेंद्र गोळे | ३ |
| ३) | नाणं चंद्रपुराचं आणि इतिहास अजमेरचा | दिलीप नारायण वंडलकर | ६ |
| ४) | पहिला पाऊस... | प्रशांत रामभाऊ सुसर | १० |
| ५) | बर्नार्डिन एव्हरिस्टोची 'बुकर' विजेती कादंबरी 'गर्ल वुमन अदर' | डॉ. प्रशांत धर्माधिकारी | १२ |
| ६) | तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल | डॉ. आनंद कुलकर्णी | १५ |
| ७) | भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे! | सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे | १७ |
| ८) | व्रत (भाग-२) | किरण वसंत पुरंदरे | २१ |
| ९) | अडलंय का? | मधुमती जयंत गौरकर | २८ |
| १०) | माणिकगड : वनराईत हरवलेली एक ऐतिहासिक वास्तू | सौ. शोभा सुधाकर आगरकर | ३२ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३५ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. ‘दिशा’च्या संदर्भात

- आपण ‘दिशा’ नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून ‘दिशा’ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२
या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर ‘दिशा’चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश ‘विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा’ या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# हिंदू साम्राज्य दिवस

*'हिंदू साम्राज्य दिवस' (१) याबद्दलची माहिती व संघ प्रार्थनेचा मराठी अनुवाद या लेखात विशद केला आहे - संपादक*



**संघ प्रार्थनेचा मराठी अनुवाद** (२)

नमू मायभूमी तुला प्रिय माते,
सुखी मी करावे तुला हिंदुभूमे ।
शिवे पुण्यभूमे तुझ्याकारणे गे,
पडो देह माझा नमू मायभू हे ।।१।।

प्रभो शक्तिशाली, मुले हिन्दुभूची,
असू सिद्ध आम्ही तुझ्या अर्चनेसी ।
तुझ्या कार्यि आहोत बांधील आम्ही,
कृपा राहु दे कार्य ते साधण्यासी ।।२।।

न हारू जगाला अशी शक्ति दे तू,
जगा नम्रता ये, असे शील दे तू ।
असे मार्ग काट्याकुट्यांचा कसाही,
जरी ऐकलेला, भला, घेतला मी ।।३।।

समुत्कर्ष होवो, नको श्रेय त्याचे,
अशा जाणिवेने स्फुरो वीरवृत्ती ।
न हो क्षीण, ऐसीच दे ध्येयनिष्ठा,
सदा जागती राहु दे अंतरी ती ।।४।।

विजेती असो संहता कार्यशक्ती,
सदा धर्म राखावया सिद्ध हो जी ।
महा वैभवी राष्ट्र नेण्यास तू हे,
असू दे कृपा खूप सामर्थ्यदा ती ।।५।।

ज्येष्ठ शुक्ल त्रयोदशी, शनिवार (३), ६ जून १६७४ रोजी, शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा संपन्न झाला. त्या दिवसापासूनच शिवाजी महाराजांनी 'राज्याभिषेक शक' सुरू केला. राज्याभिषेकाचा दिवस 'राज्याभिषेक शका'चा पहिला दिवस होता. १९७४ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने शिवाजी राजांच्या राज्याभिषेक सोहळ्याचा ३००-वा वर्धापन दिन भारतभर साजरा केला. बहुधा तेव्हापासूनच, संघ हा उत्सव सार्वत्रिकरीत्या साजरा करत आहे. २७ सप्टेंबर इ. स. १९२५ रोजी विजयादशमीच्या दिवशी, डॉ. केशव बळीरामपंत हेडगेवार यांनी त्यांच्या नागपूर येथील निवासस्थानी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. अगदी स्थापना दिवसापासूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय नागपूर येथे आहे. संघटनेचा मूळ उद्देश हिंदुधर्मीयांत सशक्त संघटन निर्माण करण्याचा आहे. काय आहे आपला हिंदू धर्म? एका शब्दात सांगायचे, तर हिंदू धर्म म्हणजे 'सहिष्णुता'. परधर्म सहिष्णुता, परकर्म सहिष्णुता, परवर्म (वर्म म्हणजे उणीव) सहिष्णुता, परमर्म (मर्म म्हणजे गुपित, रहस्य) सहिष्णुता. त्यामुळे ज्याला अशी सहिष्णुता तत्त्वतः मान्य आहे, तो तर हिंदूच ठरतो. ज्या व्यक्ती किंवा जे धर्म सहिष्णुता मानत नाहीत, ते हिंदू नाहीत. अशा ज्या लोकांना किंवा

धर्मांना, आपल्याच मायभूमीची इतर लेकरे शत्रू भासतात, वस्तुतः तेच शत्रुत्व नाहीसे करण्याची गरज आहे. सहिष्णुता म्हणजे हिंदुत्व जेव्हा सर्वव्यापी होईल तेव्हाच 'विश्व स्वधर्म सूर्यास' पाहू शकेल.

त्यामुळे, हिंदू समाजाचे एकत्रीकरण हे संघाचे मुख्य उद्दिष्ट आहे. भारतीय म्हणजे हिंदू ही संघाची व्यापक भूमिका आहे. हिंदू समाज हा पुरातन काळापासूनच अनेक वर्ण, जाती, पंथ यांत विभागला गेला आहे. प्रत्येक जात स्वतःला इतरांपेक्षा वेगळी समजते. मात्र कोणत्याही प्रकारचा वर्णद्वेषाला तसेच जातिभेदाला थारा नसलेल्या आणि सर्वच जातिपंथांमध्ये एकोपा असलेला हिंदू समाज असणे, हे संघाला अपेक्षित आहे. हे साध्य करताना अनिष्ट प्रथांचे उच्चाटन करून, इष्ट हिंदू परंपरांचे संवर्धन व्हावे, असे संघाचे धोरण आहे. सर्वसामान्यांमध्ये भारतीयत्व, राष्ट्रीयत्व, हिंदुत्व या गोष्टींचा अभिमान जागृत करणे आणि भारत देशाला परम वैभवाकडे नेणे हे आपले कर्तव्य आहे, असे संघकार्यकर्ते समजतात. काळाच्या ओघात विभाजित झालेल्या हिंदुस्थानचे एकत्रीकरण होऊन परत अखंड भारताची निर्मिती व्हावी अशीही संघाची मनीषा आहे. 'पृथिव्यां समुद्रपर्यंताया एकराळिति' म्हणजे समुद्रापर्यंतच्या सर्व भूभागावर सहिष्णू हिंदूंचे एकछत्री साम्राज्य स्थापन व्हावे अशी कामना तर आपण सारे 'मंत्रपुष्पांजली'च्या माध्यमातून रोजच करत असतो.

या राष्ट्राला पुन्हा परम वैभवाप्रत घेऊन जाण्यासाठी संघाच्या विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या संघटना आहेत. वनवासी क्षेत्रासाठी वनवासी कल्याण आश्रम, विद्यार्थी हितासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, कामगारांकरता भारतीय मजदूर संघ, महिलांकरता राष्ट्र सेविका समिती, राजकारणाकरता पूर्वीचा जनसंघ, आत्ताचा भारतीय जनता पक्ष इत्यादी. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दैनंदिन शाखा याच संघाचा पाया आहेत. शाखांमध्ये स्वयंसेवक दैनंदिन हजेरी लावतात. सरसंघचालक हे अप्रत्यक्षपणे या सर्व शाखांचे नियमन करतात. साप्ताहिक सांघिके, विद्यार्थ्यांसाठी सांघिके अशा भेटीही आठवड्यातून एकदा होतच असतात. संघाचे प्रथमवर्ष, द्वितीयवर्ष, तृतीयवर्ष शिक्षा वर्ग अनुक्रमे प्रत्येक प्रांतांत, प्रत्येक क्षेत्रात आणि सर्व भारताकरता नागपूर येथे होत असतात. संघातर्फे अनेक निवासी शिबिरेही आयोजित केली जातात. सध्या संपूर्ण भारतात लाखो शाखा लागतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघात दरसाल सहा उत्सव साजरे केले जातात. वर्षप्रतिपदा, हिंदू साम्राज्य दिन, गुरुपौर्णिमा, रक्षाबंधन, विजयादशमी आणि मकर संक्रमण. हे सर्व उत्सव हिंदू तिथींनुसार साजरे केले जातात. चंद्र आणि सूर्याच्या विशिष्ट अवस्थांशी ते जोडलेले आहेत.यातील हिंदू साम्राज्य दिन वगळता इतर सर्व उत्सव पारंपरिक हिंदू उत्सव आहेत. 'हिंदू साम्राज्य दिन' या उत्सवाचा अंतर्भाव मात्र काही वेगळा विचार करून करण्यात आलेला आहे.

इंग्रजांच्या राज्यातच १९२५ साली संघाची स्थापना करण्यात आलेली होती. शेकडो वर्षांच्या परदास्यातून हिंदू विजिगीषेला मरगळ आलेली होती. दरम्यान हिंदूंना ताठ मानेने जगता येईल, हिंदू म्हणवून घेण्यात अभिमान वाटेल असे राज्य स्थापन होणे गरजेचे आहे हे केवळ शिवाजी महाराजांनीच जाणले होते. ते साम्राज्य असावे अशी भावनाही त्यापाठी होती आणि ते सिद्ध करण्याकरता शिवाजी महाराजांनी केलेले प्रयासही अपार यशस्वी ठरलेले होते. केवळ समुद्रापर्यंतच्या साम्राज्याचीच नव्हे, तर त्यांनी समुद्रमार्गे जगावर राज्य करण्याची उमेदही बाळगली होती. त्याकरता सेनासरखेल कान्होजी आंग्रे यांच्या आधिपत्याखाली नौदलाची स्थापना केली होती. अनेक सागरी किल्ले म्हणजे जंजिरे, शिवाजी महाराजांनी आपल्या अल्पशा कारकिर्दीतच निर्माण केले होते.

दिव्यांच्या रोषणाईत आणखी दिवा लावण्यापेक्षा, तो अंधारात लावावा.

संघाने 'हिंदू साम्राज्य दिन' समारोह साजरा करायचे का ठरवले हे सांगताना, २०१० सालच्या 'हिंदू साम्राज्य दिन' (४) समारोहाच्या भाषणात माननीय सरसंघचालक मोहनजी भागवत यांनी, 'शिवसंभव' नाटकातील एक प्रसंग सांगितला आहे. शिवाजीच्या वेळी डोहाळे लागलेले असताना जिजामाता सांगतात, ''मला वाटते आहे की, मी वाघावर स्वार व्हावे. मला दोन नाही तर अठरा हात असावेत. एकेका हातात एकेक अशी अठरा शस्त्रे मी धारण करावीत. पृथ्वीतलावर जिथे जिथे राक्षस असतील, तिथे तिथे मी त्यांचा निःपात करावा. छत्रचामरादिसहित सिंहासनावर बसून मी स्वनामाचा जयघोष करवावा.'' सामान्यतः हे ऐकून किती आनंद झाला असता, की आता होणारे बालक अशा विजिगीषू वृत्तीचेच असणार. मात्र तेव्हा त्यांच्या मैत्रिणी म्हणाल्या, ''तू हा काय विचार करते आहेस? तुला माहीत नाही का की, एका राजाने असे केले होते, तेव्हा त्याचे किती हाल झाले? आपण हिंदू आहोत. सिंहासनावर कसे बसायचे? हे तर भिकेचे डोहाळे आहेत!'' म्हणजे हिंदूंनी हाती शस्त्र घेऊन पराक्रमाची इच्छा करणे, हे त्या वेळी भिकेचे लक्षण मानले जात होते. हिंदूंना या मनःस्थितीतून बाहेर काढण्याकरता, राज्याभिषेकप्रसंगीचा अपार आत्मविश्वास पुन्हा प्राप्त करवून देण्याकरता, संघाने 'हिंदू साम्राज्य दिन' समारोह साजरा करायचे ठरवले. त्या अवस्थेचे आणि शिवरायांच्या प्रयासाचे सुंदर वर्णन त्यांचे गुरू समर्थ रामदासस्वामींनी केलेले आहे. ते म्हणतातः

तीर्थक्षेत्रे मोडिली । ब्राम्हणस्थाने भ्रष्ट झाली ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ।।

देव धर्म गोब्राम्हण । करावया संरक्षण ।
हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा केली ।।

उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक ।
धूर्त तार्किक सभानायक । तुमच्या ठायी ।।

या भू मंडळाचे ठायी । धर्मरक्षी ऐसा नाही ।
महाराष्ट्र धर्म राहिला काही । तुम्हा कारणे ।।

आणिकही धर्मकृत्ये चालती। आश्रित होउन कित्येक
राहती। धन्यधन्य तुमची कीर्ती। विश्वी विस्तारली।।

कित्येक दुष्ट संहारिले। कित्येकासी धाक सुटले।
कित्येकासी आश्रय जाहले। शिवकल्याण राजा।।

याप्रमाणे प्रजेस निर्भय करणारा, अभिषिक्त हिंदू सम्राट, अर्वाचीन भारतात दुसरा कुणीही नाही. त्यांचा राज्याभिषेक झाला, त्याच दिवशी त्यांनी राज्याभिषेक शकही सुरू केला. त्या दिवसास हिंदू साम्राज्य स्थापनेचा दिवस मानून तो साजरा करावा असे संघाने ठरवले. त्यानिमित्ताने हिंदूंच्या संस्कृतीची, सहिष्णुतेची, 'वसुधैव कुटुंबकम्' वृत्तीची आणि विजिगीषू परंपरेची चर्चा होते आणि ती करणाऱ्यांवर हिंदुत्वाचे उत्तम संस्कारही होत असतात. सुसंस्कृत, सुसंघटित, शिस्तबद्ध, ऊर्जस्वल, वर्चस्वल, प्रगतिपथावर अग्रेसर असलेला पूर्ण विकसित हिंदू समाज निर्माण व्हावा हेच तर संघाचे ईप्सित आहे.

१९२७ च्या नागपुरातील मुसलमानांच्या दंग्यानंतर डॉक्टर हेडगेवार म्हणाले होते की, ''आपापसातले सारे कृत्रिम व वरवरचे मतभेद पुसून टाकून, सारा हिंदू समाज एकत्वाच्या व प्रेमाच्या भावनेने, 'हिंदू जातीची गंगा, बिंदू आम्ही तिचे सांगा' अशा भावनेने उभा राहिला, तर जगातील कोणतीच शक्ती हिंदूंकडे वाकड्या नजरेने पाहू शकणार नाही!'' (५)

हिंदूंमधे प्रबळ संघटना असावी, हिंदूंतली विघटना अवघी टळावी ।
हिंदूत्ववर्धन घडो म्हणुनी तदर्थ, तू संघ संघ जप मंत्र निजांतरात ।। – वसंततिलका

(पृष्ठ क्र.९ वर)

# नाणं चंद्रपुराचं आणि इतिहास अजमेरचा

*एखादं नाणं फक्त चलन नसून राजाचं संदेश वाहून नेणारं शक्तिशाली माध्यम असते, हे या लेखावरून समजते - संपादक*



वग्रहराज चतुर्थाचे श्रीराम लिहिलेले



अजयमेरूचे सरस्वती कंठाभरणं संस्कृत

चंद्रपूर (महाराष्ट्र) येथील भारतीय सांस्कृतिक निधीचे संयोजक श्री. अशोकसिंह ठाकूर ह्यांच्याकडे ४.२ ग्रॅ. वजनाची सुवर्णमुद्रा आहे. नाणकशास्त्राच्या भाषेत ८ ते ९ ग्रॅ. वजनाच्या सुवर्णमुद्रेला दिनार म्हणतात. म्हणजे श्री. ठाकुरांकडे असलेली मुद्रा अर्धा दिनार वजनाची. या मुद्रेच्या एका बाजूला उजव्या हाती बाण आणि डाव्या हाती धनुष्य असलेल्या, उजवीकडे बघणाऱ्या रामाची उभी प्रतिमा आहे. या प्रतिमेच्या दोन्ही बाजूंना देवनागरी लिपीत श्री आणि राम असं छापलेलं असून कमळाच्या देठात हंसाची नक्षी आहे. या चित्राला फुलांची चौकटही आहे. नाण्याच्या दुसऱ्या बाजूला देवनागरी लिपीत तीन ओळीत श्री मद्रवग्रि। ह राज दे। व ही अक्षरे छापली आहेत.

प्रस्तुतची बातमी अगदीच किरकोळ. पण, त्या अनुषंगाने गतकाळात डोकावलो, तर आपण पोहोचतो ते देदीप्यमान इतिहास लाभलेल्या चाहमान(चौहान) या हिंदू राजांच्या वंशावळीपर्यंत. हे दुर्मीळ नाणं बाराव्या शतकातील साकंबरी (सांबर) येथील चाहमान (चौहान) या राजवंशाच्या विग्रहराज-४ या राजाच्या कारकिर्दीतील असल्याचे समोर येते. या राजाने ११५३ ते ११६३ या कालावधीत राज्य केले.

विग्रहराज -४, हे चाहमान (चौहान) राजा अणौरात आणि राणी सुधावा यांचे तृतीय पुत्र. चाहमान राजे मूळचे अहिच्छत्रपूर (नागौर, राजस्थान) या गावचे. वत्सगोत्री. या कुळात जन्मलेल्या सामंतराजाने चाहमान राजवंशाची स्थापना केली. नंतर त्यांनी राजधानी शाकंभरी नावाच्या जागी हलवली. म्हणून या गादीला शाकंबरीचे राजसिंहासन म्हणत. आज त्याच जागेला सांभार म्हणतात.

अनेक कौटुंबिक उलथापालथींनंतर ११५३ साली विग्रहराज-४ नं राज्यारोहण केलं. त्याच्या आधी विग्रहराज नावाचे तीन राजे या सिंहासनावर अधिष्ठित झाल्याने, सोमेश्वर असे मूळ नाव असणाऱ्या विग्रहराज-४ याचा सुमारे दहा वर्षांचा कार्यकाळ अत्यंत देदीप्यमान होता. त्याची राजधानी जुन्या अजयमेरू व आत्ताच्या अजमेर येथे होती. चाहमान वंश नंतर चौहान म्हणून ओळखला जाऊ लागला.

---

कोणी पुसणार असेल तर डोळे भरून यायला अर्थ असतो. परंतु कोणाचेही डोळे ओले होणार नसतील तर मरणसुद्धा व्यर्थ असते.

राज्याभिषेक झाल्यानंतर त्याने सर्वप्रथम अरबी आणि तुर्की आक्रमकांच्या विरोधात मोहीम हाती घेतली आणि ती यशस्वीसुद्धा केली. खरं म्हणजे, इ.स. ७१० मध्ये मोहम्मद-बिन-कासीमच्या आक्रमणानंतर हिंस्र, क्रुर, विध्वंसक असणाऱ्या अनेक अरबी आणि तुर्की टोळ्यांनी धुमाकूळ घालून भारतात इस्लामी राजवट स्थापन करण्यात यशही मिळवलं होतं, तेव्हा त्यांचा बिमोड करणं आवश्यक होतं.

मेवाडमध्ये सापडलेल्या एका लेखात त्यानं दिल्लीचं तख्त काबीज केल्याचाही उल्लेख आढळतो. प्राचीन भारतीय इतिहासाचार्य डॉ. आर.सी. मुजूमदार लिहितात ''सम्राट विग्रहराज चतुर्थनं लाहोरपर्यंतचा प्रदेश आपल्या राज्यात सामील करून घेतला होता.'' तर इ.स. ११६४ च्या दिल्ली येथील शिवालिक स्तंभावर कोरलेल्या शिलालेखात, ''विग्रहराजाने हिमालयापासून विन्ध्याचलापर्यंतचा प्रदेश आपल्या पराक्रमाने जिंकून घेतला आणि आर्यावर्तावर त्याचं शासन आहे'', असा मजकूर आढळतो. हा स्तंभलेख सापडला तो हरयाणात शिवालिक पर्वतरांगेच्या पायथ्याशी असलेल्या टोपरा नावाच्या खेड्यात. त्यामुळे विग्रहराजांचं राज्य तिथवर होतचं होतं हे नक्की.

आता दक्षिण दिशेकडचं बघू. रविप्रभं सुरी या विद्वानानं लिहिलेल्या 'धर्मघोषस्तुती' नावाच्या ग्रंथात लिहिल्याप्रमाणे माळवा, मेवाडचे राजे अरिसिंग यांनी अजयमेरूतील राजविहार जैन मंदिरात ध्वजारोहण समारोहास मदत केली. माळव्याच्या राजाचं अजयमेरूला मंदिरावर ध्वज फडकावण्यासाठी जाणं म्हणजेच विग्रहांचा त्यांच्यावर प्रभाव होता. नव्हे, ते विग्रहराजांचे मांडलिक होते. म्हणजे हिमालय ते विंद्याचल हा प्रांत खरोखरच विग्रहराजांच्या ताब्यात होता. तर आजचे इतिहासतज्ज्ञ मानतात की, या राज्याच्या सीमा उत्तरेला शिवालिक पर्वतांची रांग ते शतद्रू (सतलज) नदीपर्यंत, पूर्वेला गंगेच्या खोऱ्यापर्यंत, दक्षिणेला विंध्य पर्वतापर्यंत तर पश्चिमेला राजस्थान, हरयाणा ते विद्यमान पाकिस्तान अशी असावी.

विग्रहराज चवथा याच्या दरबारी असलेल्या महाकवी सोमदेवांनी 'ललित विग्रहराज' या काव्यात कविराज सांगातात, ''महाराजांच्या सैन्यात १० लाख सैनिक, १ लाख घोडे आणि १ हजार हत्ती आहेत. या राजानं अरब आणि तुर्कांशी ८ ते १० लढाया लढल्या.'' त्यांच्या शौर्याची वर्णनं आजही राजस्थानी लोकगीतांत आणि कथांत गायली जातात.

'विग्रहराजाच्या काळात सुवर्णमुद्रा चलनात होत्या', या एकाच तपशिलाने त्याच्या अर्थकारणाच्या समृद्धीची कल्पना येते.

हा राजा उत्तम संगीतज्ज्ञ आणि काव्यशास्त्र-विनोदात पारंगत होता. ग्रंथप्रेमी आणि विद्वान मंडळीचं आश्रयस्थान म्हणून याची कीर्ती दूरवर पसरली होती. विविध प्रकारच्या अभिकल्पा (डिझाईन) च्या सार्वजनिक वास्तू निर्माण करण्याचा याला नाद होता. त्याने अनेक विद्वान आणि कलावंतांना राजाश्रय देऊन त्यांच्याकडून अनेक उत्तमोत्तम ग्रंथ आणि कलात्मक अभिव्यक्ती करवून घेतल्या होत्या. राजस्थानी संस्कृतीची वैशिष्ट्यपूर्ण जडणघडण होण्यात, सौंदर्याभीरूची विकसित होण्यात त्याचं मोलाचं योगदान आहे.

महाराज विग्रहराजांनी अजयमेरू नगरीत ७८ स्तंभाची आणि ७ कमानी असलेली एक भली मोठी वास्तू उभारली आणि तिला नांव दिलं होतं 'सरस्वती कंठभरणम्'. अर्थात सरस्वतीच्या कंठातील अलंकार. यात त्यांनी एकत्रित केलेली विविध विषयांची ग्रंथसंपदा जपून ठेवलेली होती. याच वास्तूत एक विख्यात संस्कृत विद्यापीठदेखील राजाश्रयानं चालवण्यात येई. विद्वत्‌जनांनी त्या ग्रंथसंपदेचा मनसोक्त लाभ घेता यावा अशीही

सुविधा तिथे होती. या वास्तूच्या भिंतीवर विग्रहराज महाराज लिखित संस्कृत नाटक 'हरकेली' (शंकराची क्रीडा/खेळ) कोरून काढलं होतं.

(टीप :- सरस्वती कंठाभरणम् ही संस्कृत व्याकरणावरील टीका असून ती भोजदेव या परमार वंशातील राजाने अकराव्या शतकात रचलेली आहे. यात आठ विभाग असून त्या प्रत्येकाचे आणखी चार छोटे विभाग आहेत. त्यांना वैदिक आणि अवैदिक भाषांत मांडले आहे. ही सगळी रचना पाणिनीच्या अष्टयाध्यायी प्रमाणेच लिपिबद्ध आहे. काहींच्या मते ती पाणिनीचीच उजळणी आहे.)

इ.स. ११५३ ते ११६४ हा विग्रहराजांचा राज्यकाळ त्यांच्या मृत्यूमुळेच संपला.

त्यांच्या मृत्यूनंतरचा जवळपास २५ वर्षांचा काळ आणखी भरभराटीचा आणि जाज्ज्वल्य शौऱ्याचा, हिंद शिरोमणी पृथ्वीराज चौहानांचा हे 'बापसे बेटा सवाई' असणारे. पृथ्वीराज महाराज विग्रहराज - ४ आणि राणी कमलादेवींचे पुत्र. या राजपूत वीरानं परदेशी आक्रमक मोहम्मद घौरीचा सोळा वेळा पराभव केला आणि प्रत्येक वेळी उदारपणा दाखवत त्याला जिवंत सोडले. (भारतीयांची जुनी खोड) मात्र, सतराव्या वेळेस जेव्हा पृथ्वीराजांचा पराभव झाला, तेव्हा मो. घौरीने त्यांना सोडले नाही आणि बंदी करून काबूलला नेले. इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी घौरीने अनन्वित छळ केला. मात्र, ''प्राण गेला तरी बेहत्तर, पण इस्लाम स्वीकारणार नाही'' असं म्हणून डोळ्यास डोळा भिडवणाऱ्या पृथ्वीराजांचे डोळे फोडण्यात आले.

काही दिवसांनंतर पृथ्वीराजाचा इमानी राजकवी 'चंद बरदाई' पृथ्वीराजांना भेटला. पृथ्वीराजांची अवस्था बघून त्याला अतिशय वाईट वाटले. त्या दोघांनी मो. घौरीला संपवण्याचा बेत रचला. त्यानुसार चंद बरदाईने मो. घौरीची भेट घेतली आणि पृथ्वीराजाच्या ध्वनी-लक्ष्य-भेद यांतील प्रावीण्याबद्दल सांगून स्वत:च ते बघण्याचे सुचविले. बेफिकीर घौरीने अनुमोदन दिले.

ठरल्यादिवशी पृथ्वीराजाला बरदाईने दरबारात आणले. त्याचे साखळदंड आणि बेड्या काढण्यात आल्या. बरदाईने आपल्या राजाच्या गुणगाण करणाऱ्या बिरुदावल्या म्हटल्या आणि बिरुदावलीच्या माध्यमातून ''चार बास, चौबीस गज, अंगुल अष्ट प्रमाण। ता उपर सुल्तान है, चुको मत चौहान'' असे म्हणून मो. घौरीच्या बसण्याच्या अंतराचा आणि उंचीचा अचूक अंदाज दिला.

तिकडे बरदाईने मो. घौरीला विनंती केली, ''सुल्तान! माझे राजे आपले बंदी आहेत. त्यामुळे आपण आज्ञा दिल्याशिवाय ते शस्त्र चालवणार नाहीत. तेव्हा आपण स्वत: त्यांना ऐकू जाईल एवढ्या उच्च स्वराने माझ्या राजांना बाण चालवण्याची आज्ञा द्यावी. घौरी या प्रशंसनेने भारावून गेला आणि त्याने मोठ्याने घोषणा केली,''चौहान, चलाओ बाण।.... चौहान, चलाओ बाण।।... चौहान, चलाओ बाण।।।....''

घौरीचा आवाज ऐकल्याबरोबर पृथ्वीराज चौहानांनी आपल्या धनुष्यावर चढवलेल्या बाणाची प्रत्यंचा ओढली आणि घौरीच्या आवाजाच्या दिशेने बाण सोडला. त्या बाणाने अचूकरित्या घौरीच्या छातीचा वेध घेतला. घौरीचा देह सिंहासनावरून खाली कोसळला.

पुढे काय होणार? हे आधीच माहीत असल्याने, ठरल्याप्रमाणे बरदाई आणि पृथ्वीराजाने एकमेकांना आलिंगन दिले आणि तत्काळ परस्परांवर वार करून स्वर्ग जवळ केला.

दिवस होता वसंत पंचमीचा! धन्य तो सेवक आणि धन्य तो राजा!!

---

प्रेम हा मनाचा सर्वात सुंदर आणि सर्वांना हवाहवासा वाटणारा आविष्कार आहे.

हा इतिहास परत एकदा Rewind करायला लावणारं, नव्हे भाग पाडणारं चंद्रपूरला असलेलं नाणं हेसुद्धा त्यामुळे त्या भव्य इतिहासारखंच महत्त्वाचं!!!

हे नाणं म्हणजे फक्त एक चलन नसून राजाचा संदेश वाहून नेणारं एक अतिशय शक्तिशाली माध्यम आहे. विग्रहराज-४ यांनी नाण्याचं अधिकल्प (डिझाइन) विचारपूर्वक तयार केलेले आहे. या नाण्याचा विचार केला, तर राजांनी आपलं ब्रीद व्यक्त केले आहे. राज्यकर्ता म्हणून महाराजांचा आदर्श प्रभू श्रीराम आहेत. महाराज श्रीरामासारखे एक बाणी आहेत, हे ध्वनित करण्यासाठी श्रीरामाच्या हाती एक बाण दिला आहे. किंबहुना, महाराज विग्रहराज आणि प्रभू श्रीराम एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हेच त्यांना ठासून सांगायचे आहे.

नंतर, ११९४ मध्ये महमद घौरीचा सेनापती कुतुबुद्दीन ऐबकानं केलेल्या हल्ल्यात अजयमेरूचा पाडाव झाला. महाराज विग्रहराजांनी निर्माण केलेल्या बहुतेक वास्तूंना थोडं थोडं पाडून वरून इस्लामी डागडुजी करण्यात आली. सरस्वती कंठाभरणम् ग्रंथालय आणि संस्कृत विद्यापीठाची पाडापाड करून त्या वास्तूंचं 'अढाई दिन का झोपडा मस्जिद' असं नामकरण करण्यात आलं. ही वास्तू अजमेरच्या प्रसिद्ध ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती दर्ग्याच्या बाजूलाच, पण वनवासात उभी असल्यासारखी आहे. सध्या ही वास्तू चौदा विद्या आणि चौसष्ट कलांच्या ७८ पैकी ७० स्तंभांना सांभाळत महाराज विग्रहराज चतुर्थच्या आठवणी आपल्या भिंतीवर जतन करत उभी आहे.

**- दिलीप नारायण वंडलकर**

४, नरकेसरी सोसायटी,

उज्ज्वल नगर, नागपूर - ४४००२५

मो. नं. ९७६६०२३४१५,९८३४६३६६५५

ईमेल : wandalkardilip@gmail.com

•••

(पृष्ठ क्र. ५ वरून - **हिंदू साम्राज्य दिवस**)

**संदर्भः**

१. भगवा ध्वज (गुरुपौर्णिमा) https://vskbihar.com/rss-guru-purnima/

२. संघ प्रार्थनेचा मराठी अनुवाद https://anuvad-ranjan.blogspot.com/2019/10/blog-post.html

३. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांची शिवचरित कथनमाला, इंद्रायणी साहित्य, २ ऑक्टोंबर १९९७, रु.१६०/, एकूण पृष्ठे-४६८ पैकी पृ.४६०.

४. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संकेतस्थळावरील २०१० सालचे मोहन भागवत यांचे व्याख्यान https://www.rss.org/hindi/encyc/2017/6/7/hindu-samrajya-din-utsav-mohan-bhagwat.html (या ठिकाणी नाटकाचे लेखक राम गणेश गडकरी आहेत असे म्हटलेले आहे. वस्तुतः हे नाटक वा. वा. खरे यांनी लिहिलेले आहे.)

५. डॉ. हेडगेवार, ना. ह. (नाना) पालकर, भारतीय विचार साधना, पुणे, आवृत्ती-५, ऑक्टो.-२०००, रु.१२०/-, एकूण पृष्ठे-४४६ पैकी पृष्ठ क्र.१६६.

**- नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,

टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,

डोंबिवली (पू.) - ४२१२०१

भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५

Email : narendra.v.gole@gmail.com

•••

ज्ञान हे तलावासारखे असून जितके खणावे तितके निर्मळ पाणी लागते.

# पहिला पाऊस...

*पहिला पाऊस म्हणजे मनाला मोहून टाकणारी गोष्ट. पहिल्या पावसाच्या वेगवेगळ्या छटांचे वर्णन करणारा श्री. प्रशांत सुसर यांचा लेख- संपादक*

आपल्या आयुष्यातील प्रत्येक पहिली गोष्ट ही अविस्मरणीयच असते, पण पहिल्या पावसाची गोष्टच न्यारी. दरवर्षी तप्त वैशाख वणव्यात भाजून निघाल्यावर चराचराला ओढ लागते ती पावसाची. लग्नकार्याच्या यथेच्छ मेजवान्या झोडून झालेल्या असतात. विद्यार्थ्यांनी सुट्टीत मामाच्या गावचा आनंद लुटलेला असतो. जूनच्या पहिल्या आठवड्यातच आभाळात काळे ढग जमू लागतात. सोसाट्याचा वारा आणि ढगांचा गडगडाट होतो. अचानक टपोरे थेंब तृषार्त धरतीचे ओठ भिजवतात. तो ओल्या मातीचा मृदगंध मनाला मोहरून टाकतो. मन भूतकाळातल्या बालपणीच्या रम्य आठवणींत हरवून जाते. लहानपणी 'येरे येरे पावसा तुला देतो पैसा' म्हणत पावसाला केलेली विनवणी आठवते. आता मात्र 'रेन रेन कम अगेन' शिकताना आणि शिकवताना ती मजा येत नाही. या पहिल्या पावसाची ओढ सर्वांनाच असते. बळीराजा आपलं शेत शिवार तयार करून आकाशाकडे डोळे लावून बसलेला असतो. कधी एकदा पाऊस येईल आणि मी पेरणी करेन याची तो चातकासारखी वाट पाहत असतो. विदर्भ मराठवाड्यात पाऊस आला नाही, तर 'धोंडी धोंडी पाणी दे दाळ दाणा पिकू दे' असं म्हणत पावसाला साकडं घातलं जातं. या पहिल्या पावसात लहानग्यांना भिजायचं असतं. चिखलात नाचायचं व खेळायचं असतं.




शाळा सुरू होण्याची चाहूल लागलेली असते. नवीन वह्या, पुस्तके, छत्री, रेनकोट, दप्तर यांच्या खरेदीची लगबग सुरू असते. ओल्या मातीच्या वासासोबतच आणखी एक वास मनात चैतन्य पसरवत असतो, तो म्हणजे कोऱ्या वह्या- पुस्तकांचा वास. लेखक आणि कवी यांना पावसावर लिहावंसं वाटतं, ते पावसाच्या पहिल्या सरींसोबतच.

शांता शेळके म्हणतात,

'साद पावसाची आली, शहारली माती,  
भुईसवे आभाळाची  
जुळे आज प्रीती'.

पेरणीचे वर्णन करताना आमच्या बहिणाबाई म्हणतात,

धरत्रीच्या कुशीमधी  
बिय बियाणं निजली  
वरे पसरली माटी  
जशी शाल पांघरली  
बिय टरारे भुईत  
सर्वे कोंब आले वरे  
गह्यरल शेत जसं  
अंगावरती शहारे

उन्हाने रापून काळ्या पडलेल्या अंगावर धरती माय पहिल्या पावसाने जणू हिरवा शालू पांघरते.

सर्व गुन्हे माफ होतात, असे न्यायालय, म्हणजे आईचे हृदय.

जिकडेतिकडे चैतन्याचा मोहोर फुलून येतो. सारी सजीव सृष्टी आनंदून जाते. पेरणी लागल्याच्या आनंदात शेतकरीही सुखावतो. व्यापारी, मजूर आणि चाकरमानीही मनोमन सुखावतात. कारण ज्या कृषिव्यवस्थेवर भारताची अर्थव्यवस्था अवलंबून आहे, ती कृषिव्यवस्था या पावसावरच अवलंबून आहे हे सारेच जाणतात. मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने खूप प्रगती केली, मात्र अजूनपर्यंत त्याला निसर्गावर मात करता आली नाही. कृत्रिम पाऊस पाडण्याचेही प्रयत्न झाले, मात्र ते यशस्वी ठरू शकले नाहीत. पाऊस डाऊनलोड करता येईल असं एखादं तंत्रज्ञान अजून आपण विकसित करू शकलो नाही. म्हणून आपल्या मर्यादा जाणून पर्यावरणात हस्तक्षेप न करता झाडे लावून आपण निसर्गाला जपलं पाहिजे. कॉलेजात जाणाऱ्या तरुणाईलाही हा पाऊस भुरळ घालतो. कॉलेजचे ते मोरपंखी दिवस आणि पहिला पाऊस... प्रेमासाठी पोषक वातावरण आपोआपच तयार होते. आणि सोबतीला असतो गारवा.

गारवा वाऱ्यावर भिर भिर पारवा नवा नवा
प्रिये नभी हा चांदवा नवा नवा

आणि मग त्याच्या प्रेमाला प्रेयसीही तितक्याच अधीरतेने साद घालते.. आणि आपल्या भावना व्यक्त करते,

अधीर मन झाले, मधुर घन आले, धुक्यातुनी नभातले सख्या प्रिया सुरीतुनी  सुरेल धुंद स्वर हे आले अधीर मन झाले

जीवनात औदासीन्य आलेल्या माणसालाही पहिला पाऊस पल्लवित करतो.

कवी ग्रेस म्हणतात त्याप्रमाणे,

पाऊस कधीचा पडतो झाडांची हलती पाने
हलकेच जाग मज आली दुःखाच्या मंद सुराने

अशी त्याची अवस्था होते आणि क्षणभर का होईना तो आपल्या दुःखातून बाहेर येतो. बाहेर कोसळणारा पाऊस आणि खिडकीत बसून तो पाऊस पाहताना होणारा आनंद, पहिल्या पावसात भिजताना होणारा आनंद हा अवर्णनीयच.

बाहेर पाऊस सुरू असताना हातात पुस्तक आणि वाफाळलेला चहा म्हणजे जणू स्वर्गसुखच.

जीवनाच्या धावपळीत घामाघूम होऊन जेव्हा आपण थकून जातो, तेव्हा पहिला पाऊस आपल्याला हळवं करतो. मनावरून एक जादुई मोरपीस फिरवल्यागत पुन्हा एकदा आपण त्या निरागस बालपणात हरवतो. बाहेर पाऊस कोसळत असतो आणि मन जगजीतजींच्या ओळी गुणगुणत असतं...

ये दौलत भी ले लो
ये शोहरत भी ले लो
भले छिन लो मुझसे मेरी जवानी
मगर मुझको लौटा दो बचपन का सावन
वो कागज की कश्ती वो बारिश का पानी...!!!

पहिल्या पावसाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !


**– प्रशांत रामभाऊ सुसर**
प्रगतीशील शिक्षक व लेखक,
बुलडाणा
मोबाईल: ९८६०४१२८२५

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

# बर्नार्डिन एव्हरिस्टोची 'बुकर' विजेती कादंबरी 'गर्ल वुमन अदर'

*आफ्रिकेतून इंग्लंडमध्ये स्थलांतरित झालेल्या कृष्णवर्णीय स्त्रियांची धडपड अधोरेखित करणारी २०१९ साली पुरस्कार मिळालेली बर्नार्डिन एव्हरिस्टो यांची हॅमिश हॅमिल्टन प्रकाशनाची ३३६ पानांची कादंबरी. या कादंबरीवर प्रकाश टाकणारा डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांचा लेख – संपादक*




मागरिट ॲटवुड यांच्या द टेस्टमेंटस् या कादंबरीसह हा पुरस्कार विभागून दिला गेला. एव्हरिस्टो या बुकर मिळालेल्या पहिल्या कृष्णवर्णीय महिला आहेत.

बर्नार्डिन एव्हरिस्टो यांचा जन्म लंडनमध्ये ब्रिटिश आई व नायजेरियन वडील यांच्या घरी झाला. ग्रीनीच यंग पीपल्स थिएटरमध्ये नाटकाचे शिक्षण घेऊन गोल्डस्मिथ कॉलेज युनिव्हर्सिटी ऑफ लंडन येथून कल्पक लेखनात त्यांनी डॉक्टरेट मिळवली. सध्या ब्रूनेल विद्यापीठ लंडन येथे अध्यापन. एम्परर बेब (२००१) हॅलो मम (२०१०) ही प्रसिद्ध पुस्तके.

एव्हरिस्टो यांची आठ पुस्तके प्रकाशित झाली असून ब्रिटनमध्ये स्थलांतरित झालेल्या आफ्रिकन वंशाच्या लोकांचे जीवनदर्शन यात घडते. गद्य व पद्य यांचे बेमालूम मिश्रण हा त्यांच्या लेखनशैलीचा विशेष. १९८० साली कृष्णवर्णीय महिलांसाठी त्यांनी नाट्य चळवळ सुरू केली.

आफ्रिकेमधून ब्रिटनमध्ये स्थलांतरित झालेल्या पिढीची स्थिरावण्याची धडपड बर्नार्डिन एव्हरिस्टो यांच्या 'गर्ल, वुमन, अदर' या बारा लघुकादंबऱ्यांनी संपन्न असलेल्या ग्रंथाचा मुख्य गाभा आहे. त्यात ब्रिटनमधील कृष्णवंशीय– त्यातही डझनभर स्त्रियांमध्ये चार आई, त्यांच्या चार मुली आणि या व्यक्तिरेखांच्या आयुष्यात आत्यंतिक महत्त्वाच्या असलेल्या इतर चार महिला, अशा मिळून बारा जणींच्या सांगितलेल्या गोष्टी स्त्रीवाद, स्त्रीमुक्ती आणि स्त्रीमौजवाद या संकल्पनांकडे तटस्थ दृष्टीने पाहतात.

आफ्रिकेतील घाना, सोमालिया, नायजेरिया या देशांसह कॅरेबियन बेटांवरून लंडनमध्ये नशीब अजमावण्यासाठी आलेल्या लोकांचा इथल्या समाजात सामावण्याचा इतिहास खूपच रंजक शैलीमध्ये उतरलेला आहे.

कादंबरीला सुरुवात होते ॲमा या प्रथितयश नाटककारापासून. तिच्या नव्या नाटकाचा प्रयोग नॅशनल अकादमीमध्ये सुरू होणार असून ते त्यापूर्वीचा तिच्या आत्मविकासाच्या प्रवासाकडे पाहताना दिसते. सत्तरीच्या दशकातील स्त्रीवादी विचारसरणी अंगीकारलेली आकर्षक ॲमा समलिंगी असून तिने तिच्या समविचारी कृष्णवंशीय मैत्रिणींची भलीमोठी फौज तिच्यासोबत कायम ठेवली

आहे. सुधारक विचारांच्या 'गे' नवऱ्यासोबत ५१व्या वर्षी तिचा संसार सुरळीत सुरू आहे. ज्या स्त्रीमुक्तीच्या विचारांवर तिच्या जगण्याचे तत्त्वज्ञान अवलंबून आहे, ते आपल्या मुलीच्या बाबत वापरताना ती काहीशी कंजुषी करीत असल्यासारखे भासते. याझ या १९ वर्षीय मुलीच्या कपडय़ांच्या निवडीपासून ते जगण्यापर्यंत तिचे काहीसे आक्षेप आहेत. तिचे जगणे नियंत्रणात आणण्याची तिची तीव्र इच्छा आहे. रंगभूमीवर प्रचंड अनुभव असतानाही लोक नव्या नाटकाचे स्वागत कसे करतील, याबाबत ती पहिल्या नाटकाच्या वेळेसारखी भेदरलेली दिसते. शाळेच्या शेवटच्या वर्षांपासून कृष्णवंशीय मुलींच्या हक्कांसाठी संघटना उभारणारी ॲमा कृष्णवंशीय महिलांच्या जगभरातील साहित्य-विचारांचा अर्क घेऊन मोठी झालेली असते. डॉमनिक या तिच्या लाडक्या मैत्रिणीसह लंडनमधील प्रायोगिक रंगभूमीचा इतिहास आणि मुक्तच्छंदात जगणाऱ्या व्यक्तींची बरीच माहिती ॲमाच्या कथेमध्ये येते. जे स्वातंत्र्य घेऊन आपण प्रगल्भ झालो, ते आपली मुलगी उपभोगत असलेला विचारही तिला खपत नाही. हा कथेतील व्यक्तीचा वैचारिक विरोधाभास एव्हरिस्टो यांनी अचूक नोंदविला आहे.

इंग्रजी साहित्याचा अभ्यास करणाऱ्या याझला पत्रकार व्हायचे असून जगातला सर्वांत वादग्रस्त स्तंभ लिहिण्याचा तिचा विचार आहे. कारण तिच्या मते, जगाने ऐकावे इतके सांगण्यासारखे तिच्याकडे भरपूर आहे. तिच्या विचारांची जडणघडण होण्याच्या कालावधीत अमेरिकेमध्ये पहिल्या कृष्णवंशीय अध्यक्षाच्या निवडीचा इतिहास घडला आहे. त्या घटनेने तिच्या भोवताली बराक ओबामा यांना आदर्श ठेवून राजकारणात जाण्यासाठी अभ्यास करू लागलेल्या मुलींची उदाहरणे तिने पाहिली आहेत. समोरच्या परिस्थितीकडे व्यंगाने पाहणारी ही मुलगी आपल्या आईचा- म्हणजेच ॲमाचा स्त्रीवाद बेगडी ठरविते. सतत कोणत्या ना कोणत्या राजकीय विषयांवर मत-मतांतरे व्यक्त करण्यासाठी टीव्हीवर बोलावल्या जाणाऱ्या विचारवंत लेखक बापाची खिल्ली उडविते.

ॲमाच्या नाटकाच्या प्रयोगादरम्यान एका व्यक्तीचे वर्णन करताना ती म्हणते, की सध्या रंगमंचावरील कोणत्याही नाटकापेक्षा जागतिक राजकीय पटलावर ओतप्रोत नाट्य भरले असून 'ब्रेग्झिट' आणि 'ट्रम्पक्केक' या दोन घटनांमध्ये आजच्या काळावर केलेला सर्वांत मोठा विनोद आहे, अशी या व्यक्तीची धारणा असल्याने तो इतरांपासून वेगळा आहे. वारिस नावाच्या बुरखा घालणाऱ्या सोमाली मुस्लीम तरुणीशी याझची सर्वाधिक घसट आहे. २००१ अमेरिकेवर साली झालेल्या हल्ल्यानंतर ब्रिटनमधील मुस्लीम व्यक्तींना मिळणाऱ्या संशयास्पद वागणुकीने वारिसचे आयुष्य बदलून टाकलेले असते. तरीही बुरखा घालून वर स्वसंरक्षणासाठी मार्शल आर्ट्स शिकणाऱ्या आपल्या समकालीन वारिसच्या आत्मविश्वासाचे व्यक्तिचित्र याझ सांगताना दिसते. आपल्या भोवतालच्या कृष्णवंशीय व्यक्तींमध्ये तिला एकही उत्तम प्रियकर सापडत नाही. पत्रकार बनण्यासाठी प्रचंड टोकदार व्यंगशैली असलेली याझ आपल्या उद्दिष्टपूर्तीकडे वाटचाल करताना दिसते.

डॉमनिक या ॲमाच्या सर्वांत लाडक्या मैत्रिणीची कथा येते. ती आजच्या स्त्रीवादाबद्दल प्रश्न विचारते. झिंगा या आफ्रो-अमेरिकी मैत्रिणीच्या प्रेमात पडलेली डॉमनिक तिच्यासोबत लंडनमधील थिएटर सोडून अमेरिकेला जाते. तिथे फक्त महिलांनी महिलांसाठी वसविलेल्या शहरात हे समलैंगिक जोडपे राहू लागते. सुरुवातीच्या आनंदी सहवासानंतर झिंगा डॉमनिकवर पुरुषासारखे वर्चस्व गाजवते. इतर महिलांशी बोलण्या-चालण्यापासून तिच्या फेरफटक्यावर निर्बंध आणते. डॉमनिकला मीठरहित जेवणापासून ते मद्यमुक्त जगण्यापर्यंत

बडबड कमी व कर्तव्य अधिक अशा वृत्तीची माणसे जीवनात यशस्वी होतात.

भाग पाडते. तिच्या आज्ञांचे पालन न केल्यास डॉमनिकला मारहाणही करते. तीन वर्षे या मानसिक आणि शारीरिक जाचाला कंटाळून डॉमनिक त्या शहरातून पळ काढते. मात्र पुन्हा लंडनमध्ये न जाता अमेरिकेत स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी सज्ज होते.

कॅरल या इन्व्हेस्टमेण्ट बँकरची गोष्टदेखील शून्यातून विश्व उभारणाऱ्या मुलीची आहे. १३व्या वर्षी सामूहिक बलात्कार झालेली कॅरल आपल्यावरील अत्याचाराच्या जखमांवर मात करीत गणिताच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करते. नायजेरियामधून स्थलांतरित झालेल्या आणि साफसफाईचे काम करणाऱ्या आईच्या पोटी जन्मलेली कॅरल गोऱ्यांच्या भूमीत कृष्णवंशीय म्हणून मिळणारे अपमान, दुय्यम वागणूक यांविषयीच्या रागाचा शस्त्र म्हणून वापर करीत पुढे जाते. आपली आज्ञा मोडून कॅरलने गोऱ्या व्यक्तीशी लग्न करण्याचा निर्णय तिची आई बम्मी नुसता पचवतच नाही, तर घानामधून आलेल्या वृद्धाशी उतारवयात लग्न करताना दिसते.

मूळ देशातील प्रथा-परंपरांच्या पगड्यातून मुक्त होऊन स्वातंत्र्य कमावलेल्या महिलांनी लंडनमध्ये तयार झालेल्या नव्या मूल्यजाणिवांचा डोलारा पुढल्या पिढीकडून मोडला जाण्याचा प्रवास जवळजवळ प्रत्येक कथेमध्ये आला आहे. इथल्या प्रत्येकाला उभे राहण्यासाठी आपापल्या पातळीवर तीव्र संघर्ष करावा लागला असून त्यात कुणीही मोडून पडले अथवा अयशस्वी झालेले नाही. प्रचंड विचित्र कुटुंबात जन्मलेली लतीशा १९व्या वर्षीच आई बनते. फूस लावून सोडून देणाऱ्या व्यक्तींची पुनरावृत्ती तिच्याबाबत ३०व्या वर्षी तीन बाळंतपणे उरकण्यापर्यंत संपत नाही. आपल्या आई आणि सावत्र बहिणीसोबत या मुलांना वाढवितानाही, ती एका मॉलमधील विक्री विभागात बढती मिळविण्यासाठी मर-मर मेहनत करते.

शर्ली किंग ही शिक्षिका आपल्या कृष्णवंशीयपणातून आलेल्या काहीशा न्यूनगंडावर मात करून शाळेत विद्यार्थ्यांची उत्तम पिढी घडविण्याच्या कार्यात स्वत:ला झोकून देते. शर्लीची कथा ब्रिटनमधील शिक्षण व्यवस्थेसोबत बदलत्या समाजाची नोंद तीव्रतेने घेताना दिसते. विन्सम, पेनेलॉप, मेगन-मॉर्गन, हॅट्टी, ग्रेस यांच्या कथांमधूनही कृष्णवंशीयांच्या जगण्याचे संदर्भ आजच्या ब्रिटनला कवेत घेऊन येतात.

दीन-दुबळ्यांचे जगणे युद्धानंतर गेल्या ७० वर्षांत बरेच बदलले. तो बदल हा आजच्या आफ्रो-अमेरिकी, आफ्रो-ब्रिटिश साहित्यामधून नुकताच डोकावू लागला आहे. याचे मोठे उदाहरण म्हणून 'गर्ल, वुमन, अदर' कादंबरीकडे पाहावे लागेल.

**संदर्भ:**

१. भोसले पंकज, स्थिरावण्याच्या धडपडीचा इतिहास, लोकसत्ता, २१ सप्टेंबर २०१९

२. https://en.m.wikipedia.org/wiki/Bernardine_Evaristo

**- डॉ. प्रशांत धर्माधिकारी**
इंग्रजी विभाग,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे
भ्रमणध्वनी - ९४२२४९५०९४

•••

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

साबणाने धुतलेल्या कपड्यांपेक्षा प्रेमाने स्वच्छ केलेल्या अंतःकरणाची उज्ज्वलता अधिक खुलून दिसते.

# तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल

*प्रस्तुत लेखात संतश्रेष्ठ नामदेवांच्या 'तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल' या अभंगावर डॉ. आनंद कुलकर्णी यांनी प्रकाश टाकला आहे - संपादक*

'तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल' हा संतश्रेष्ठ नामदेवांचा अभंग स्वरभास्कर पं. भीमसेन जोशींच्या स्वर्गीय आवाजात आपण असंख्य वेळा ऐकलाय. परवा मी हा अभंग ऐकला आणि डोक्यात लख्ख झालं. अचानक वीज चमकून जावी तसा शब्दांचा आशय झळाळून उठला. यातील अनेक शब्दांची संगती मला माझ्यापुरती लावता आली पण, वीज चमकली ती 'नामा म्हणे मज विठ्ठल सापडला' या शेवटच्या, नाममुद्रेच्या ओळीत.



हा अभंग म्हणजे विठ्ठलाशी संपूर्णपणे एकरूप झालेली अवस्था. आता अशा अवस्थेचं वर्णन कसं करायचं? कारण ही अवस्था अनुभवायची असते. ती सांगून कशी कळणार? पण नामदेवांसारखा अनुभवसिद्ध संत अशी गूढ अनुभूतीही सहज, साध्या शब्दांत व्यक्त करू शकतो. नामदेवांकडे ही सहजता अशीच आली नाही. त्यासाठी त्यांना एकतर 'अनुभवे आले अंगा' असं झालेलं असतं. आणि दुसरं म्हणजे 'न बोलतां तुम्हां कळों न ये गुज'- आपल्याला कळलेलं गूज लोकांना कळत नाही या अगतिकतेतून आलेलं असतं. बोलल्याशिवाय कळणारच नसेल, तर मग बोलावंच लागेल, मग बोली अरूपाचे रूप दाखवावेच लागेल. नामदेव जगलेच लोकांच्या हितासाठी. लोकांच्या मनात ज्ञानदीप लावण्यासाठी अख्खं आयुष्य त्यांनी खर्ची घातलं. असा कळवळा असलेला माणूस आपला अनुभव कसा सांगेल? लोकांना कळेल अशा शब्दांत आणि अशा उदाहरणांमधून सांगेल. या अभंगात तेच घडतं. बघावं तिकडे आणि बघावं त्यात विठ्ठल दिसणं हा खरं तर केवढा आमूलाग्र बदल! विठ्ठल जणू दिठीचा ठावो झालाय, मनाचा विषय झालाय. विठ्ठल दृष्टीतच बसलाय. मग बघावं ते विठ्ठलमय असणारचं. आपल्याकडच्या संतांची ही परिवर्तनाची प्रक्रिया मला प्रचंड आवडते. हा असा बदल सोपा थोडाच असतो. 'जळे माझी काया लागला वोणवा' असं होऊन स्वार्थाची होळी झाल्याशिवाय आणि मागिलांची आस सुटल्याशिवाय असा बदल घडत नाही. बाहेरचे बदल हे लोकांसाठी असतात. त्यात दाखवायचं असतं, पण हा वरचा झळाळ अंतरी उतरावा लागतो. बदल आत-मनात घडावे लागतात. अशा बदलांना ना कॉस्मेटिक्स लावून दाखवता येतं ना कस्टमाईज करता येतं. ते घडतात अनुभवाच्या पातळीवर आणि मग जगच विठ्ठलमय होऊन जातं. नामदेवांच्या दृष्टीतील बदल हा असा अंतरंगी झालेल्या प्रचितीचं दृश्यरूप आहे.

कसं वर्णन करतात नामदेव या विठ्ठलमय अवस्थेचं? हा अभंग चढत्या क्रमाने आपल्याला अनुभूतीच्या शिखरावर घेऊन जातो. आधी ठिकाण, मग नातेसंबंध आणि शेवटी प्रत्यक्ष अनुभूती असा हा क्रम आहे. 'तीर्थ' म्हणजे चंद्रभागा आणि 'क्षेत्र' म्हणजे पंढरपूर. (याचे अजून वेगळे अर्थ लावता येतात. पण तुर्तास

आपण यावरच थांबू.) चंद्रभागेत आणि पंढरपुरात नामदेवांना विठ्ठल दिसतो. दृष्टीच्या बदलाची सुरुवात अशी लौकिकातून होते. ज्ञात, भौतिक जगातून अज्ञाताकडे सुरू झालेला हा प्रवास आहे. पंढरपुरी आणि चंद्रभागेच्या काठी असलेला देव विठ्ठल आणि त्याची पूजाही विठ्ठलच आहे. आता बदलाची घनता वाढायला सुरुवात होते. देव विठ्ठल आहे इथपर्यंत ठीक आहे, पण देवपूजाही विठ्ठलच? हे म्हणजे काहीतरी वेगळं घडतंय. विठ्ठल साध्य आहे आणि नामदेवांना तिथपर्यंत पोहोचायचंय. पण त्यासाठी देवपूजा हे साधन आहे. देवपूजा ही मोडॅलिटी आहे, ती करावीच लागेल. रस्ता चालून गेल्याशिवाय घर कसं येणार? देव पाहिजे म्हणून देवपूजा करायचीय. पण होतं असं की, जिथे पोहोचायचंय ते साध्य म्हणजे देव आणि ज्याच्यामार्फत पोहोचायचयं ते साधन म्हणजे देवपूजा यांतला फरकच नष्ट होतो. देव आणि त्याची पूजा यातलं अंतरच मिटून जातं. देवपूजाच देव होऊन जाते. असं झाल्यावर यातायात करायची गरजच नाही. आता कर्मकांडाची गरज नाही. आणि हे घडलं कोणामुळे? विठ्ठलामुळे. विठ्ठलमय झाल्याने नामदेवांना देव आणि देवपूजा यांत विठ्ठलच दिसतो. भेदच संपला, दोनपण संपलं. 'पाया पडू गेले तव पाऊलची न दिसे' अशी ही नवलाई आहे.

आता ही अवस्था नात्यांवर येते. माता विठ्ठल, पिता विठ्ठल. विठ्ठल नामदेवांच्या मनी मानसी कसा भिनत राहतो बघा. लौकिकातील माय-बापाचं रूपक वापरून नामदेव लोकांना समजेल अशा भाषेत लिहितात, असा बदल शक्य आहे असा धीर देतात आणि विठ्ठलाची प्राप्ती झाल्यावर लौकिक नात्यांची तमा राहात नाही हे सूचवतात. जन्म देणं ही शारीरिक घटना आहे. जन्माने आपल्याला शरीर मिळतं आणि माय-बाप असं शरीर आपल्याला देतात, पण अशा शरीराचं-आयुष्याचं काय करायचं ही दृष्टी विठ्ठल देतो. अशी दृष्टी मिळाली की, विठ्ठलात माय-बाप दिसतात आणि माय-बापात विठ्ठल दिसतो. हेच बंधू आणि गोत्राच्या बाबतीत खरं आहे. देवाकडे घेऊन जाणारा वाटाड्या गुरू आहे. म्हणजे आपलीच आपल्याला ओळख करून देणारा मार्गदर्शक आहे. तेव्हा त्याची आराधना करणं आलंच. पण विठ्ठल नामदेवांच्या अंतरी बसतो. मग देव आणि देवपूजेसारखाच गुरू आणि गुरूपूजाही विठ्ठलमय होते. वेगळेपण संपत, एकत्वाचा अनुभव येतो.

यानंतरच्या ओळीपासून लखलखाट तीव्र होतो. आता नात्यांचं रूपक संपतं. अजून एक मोठा टप्पा गाठलेलला असतो. विठ्ठल आता निधान होतो- आनंदनिधान! जणू नामदेवांना कधीही रिकामा न होणारा खजिनाच सापडलाय. शिवाय विठ्ठल जसा आनंदाचा खजिना आहे, तसाच तो निरंतर आहे. नामदेवांच्या सदोदित सोबत असणारा विठ्ठल. विठ्ठल नाही अशी अवस्थाच नाही. नामदेवांना विठ्ठलाची सतत सोबत आहे. नामदेव आता सगळ्यांतून अलिप्त आहेत आणि विठ्ठलाने लिप्त आहेत. सगळ्यांना सोडल्याने त्यांना विठ्ठल मिळालाय. पण गंमत अशी की, विठ्ठलाच्या प्राप्तीमुळे नामदेवांना सगळ्यांत पुन्हा तोच दिसतो. कारण विठ्ठल म्हणजे अवघं जग. तो ज्याला मिळाला, त्याच्यासाठी जगच विठ्ठलमय होतं.

आता 'नामा म्हणे मज विठ्ठल सापडला' असा विजेचा लोळच अंगावर येतो. मुळात विठ्ठल सापडला म्हणजे काय? विठ्ठल सापडला म्हणजे आधी हरवला होता का? आणि विठ्ठल असा सापडतो? नामदेव विठ्ठलाला शोधत आहेत याचा प्रतिकात्मक अर्थ घ्यावा लागतो. नामदेव विठ्ठलाला शोधत आहेत म्हणजे पंढरीत उभ्या असलेल्या विठ्ठलाला शोधत नाहीत. त्यांच्या अंतरी वसलेल्या विठ्ठलाला शोधताहेत. एकदा अंतरीचा दिवा लागला की, मग आपला विठ्ठल आपल्याला सापडतो. विठ्ठल म्हणजे स्वत:चंच व्यापक-विराट रूप! सगळ्या भेदाभेदांच्या पलीकडे असलेली अवस्था. असं

(पृष्ठ क्र. ३१ वर)

कणाकणाने मुंगी वारुळ बनविते. किती सूक्ष्म असतो तिचा जीव! मग तर आपण मनुष्य आहोत.

# भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे!

*अक्कलकोट निवासी श्रीस्वामी समर्थांविषयी माहिती देणारा लेख - संपादक*

भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे! हे उद्‌गार वाचले की, लागलीच आपणास श्रीस्वामी समर्थांची आठवण येते. स्वामी समर्थ हे आधुनिक भारतातील एक लोकप्रिय सिद्धपुरुष होते. त्यांचे भक्तगण महाराष्ट्रातच नव्हे, तर महाराष्ट्राबाहेरदेखील आहेत. परंतु स्वामी अक्कलकोट येथे निवास करत असत. दत्त संप्रदायात स्वामी समर्थांचे अतिशय महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्यांना दत्तसंप्रदायात श्रीगुरुदत्तांचा तिसरा अवतार मानला जातो. श्रीपाद वल्लभ व श्रीनृसिंह सरस्वती यांना दत्तगुरूंचा अनुक्रमे पहिला व दुसरा अवतार असल्याचे मानले जाते.

अक्कलकोट या ठिकाणी स्वामी समर्थांनी बरीच वर्षे व्यतित केल्यामुळे हे ठिकाण स्वामी भक्तांसाठी फार पवित्र आहे. वर्षानुवर्षांपासून स्वामिभक्त अक्कलकोटास येत असतात. अक्कलकोट हे ठिकाण महाराष्ट्रातील सोलापूर या जिल्ह्यात आहे. जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या आग्नेयेस साधारणपणे ४० किलोमीटर एवढ्या अंतरावर अक्कलकोट हे ठिकाण आहे. आपण अक्कलकोटाच्या स्थानाविषयी विचार केल्यास असे लक्षात येते की, हे ठिकाण महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यांच्या सीमेवर वसलेले आहे. ब्रिटिश काळात अक्कलकोट हे संस्थान होते व त्यावर भोसले कुळातील राजांचे शासन होते.

असे म्हटले जाते की, स्वामी समर्थ १८५७ च्या आसपास अक्कलकोटला आले. काही स्रोतांतून ते १८५६ साली अक्कलकोटला आले अशी माहिती मिळते. भाविक असे मानतात की, स्वामी समर्थ दक्षिण भारतातील कर्दळीवनातून आले. अक्कलकोटला येण्यापूर्वी त्यांनी भारतभ्रमण केले. आपण येथे १८५७ या सालाचा उल्लेख केला. हे वर्ष आधुनिक भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाचे वर्ष मानले जाते. याचे कारण म्हणजे, या वर्षी ब्रिटिश शासकांविरुद्ध पहिला मोठा उठाव झाला. या उठावाची दाहकता एवढी होती की, प्रबळ अशा ब्रिटिश साम्राज्याची भारतातील पाळेमुळे हादरून गेली. असो. स्वामी समर्थांच्या पावलांनी पुनीत झालेल्या या अक्कलकोटला वर्षभर भाविकांची रीघ लागलेली असते. त्या काळी अक्कलकोटात स्वामी अनेकदा वटवृक्षाखाली बसलेले आढळत.

आपण येथे कर्दळीवनाचा उल्लेख केला. त्यामुळे या कर्दळीवनाविषयी अधिक माहिती घेणे संयुक्तिक ठरेल. दत्तसंप्रदायातील भक्तगण व परंपरा असे मानते की, श्रीनृसिंह सरस्वती कर्दळीवनात गेले व तेथे वट, औदुंबर व अश्वत्थ असे तीन वृक्ष एकत्र वाढले होते तेथे ध्यानस्थ अवस्थेत बसले. नृसिंह सरस्वतींचे हे ध्यान जवळपास साडे तीनशे वर्षे चालू होते असे भक्तमंडळी म्हणतात. कर्दळीवन दक्षिणेतील आंध्र प्रदेश या राज्यात कृष्णा नदीच्या काठी आहे. येथे कृष्णा नदीला पाताळगंगा असे म्हणतात. तर आपण असे पाहिले की, साधारणपणे तेराव्या शतकात नृसिंह सरस्वती कर्दळीवनात गेले व तेथे समाधिरूपात ध्यान करू लागले. तद्‌नंतर जवळजवळ साडेतीनशे वर्षांनंतर तेथील एक आदिवासी लाकूडतोड्या तेथे लाकडे तोडण्यासाठी गेला. जेथे नृसिंह सरस्वती समाधी लावून बसले होते. तेथे

मोठे वारूळ निर्माण झाले होते. त्या वारुळातून सर्पांचादेखील सुळसुळाट होता. नृसिंह सरस्वतींचा देह त्या वारुळात होता. लाकूडतोड्या लाकडे तोडत असताना त्याचा घाव त्या वारुळावर लागला. त्याच क्षणी त्या वारुळातून रक्ताचा ओघळ सुरू झाला व त्यानंतर त्या वारुळातून एक विलक्षण दैवी स्वरूपाची मानवी मूर्ती बाहेर आली. वारुळातून बाहेर आलेले हे दैवी पुरुष म्हणजे स्वामी समर्थ होते.

कर्दळीवन वृक्ष व वेलींनी संपन्न असून तेथे दलदलदेखील आहे. असे म्हटले जाते की, कर्दळीवनाची यात्रा हा चारधाम व मानसरोवर यात्रेप्रमाणेच खडतर असते. दत्तसंप्रदायातील भक्तांची अशी भावना आहे की, अवधूत श्रीस्वामी समर्थांच्या कृपेशिवाय कर्दळीवनाची यात्रा पूर्ण करण्याची इच्छा होत नाही. कर्दळीवन श्रीशैलम् ज्योतिर्लिंगाच्या आसपास आहे. कर्दळीवनात नाथ संप्रदायातील साधू व गोसावी ध्यानधारणा करण्यासाठी येत असतात. गेली कित्येक वर्षे इकडे येणाऱ्या भक्तांची संख्या फार कमी होती. परंतु सध्या कर्दळीवनात बऱ्याच मोठ्या प्रमाणात भाविक येताना दिसतात. भक्तगण कर्दळीवनाची परिक्रमादेखील करतात. कर्दळीवन परिक्रमा करताना व ती पूर्ण झाल्यानंतर दत्तसंप्रदायींना एक वेगळीच अनुभूती आल्याचा अनुभव त्यांनी कथन केल्याचे आपल्या वाचनात येते. दत्तसंप्रदायाप्रमाणेच वीरशैव (लिंगायत) पंथातदेखील कर्दळीवनाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. वीरशैव पंथीय असे मानतात की, अक्कमहा देवीने कर्दळीवनातच तपश्चर्या केली होती व तेथेच त्या मल्लिकार्जुनात विलीन झाल्या होत्या.

असे म्हटले जाते की, कर्दळीवनाची परिक्रमा करत असताना पाच ठिकाणी दर्शन घ्यावे लागते. या संपूर्ण परिक्रमेचा मार्ग जवळजवळ छत्तीस किलोमीटर एवढा असल्याचे बोलले जाते. परिक्रमेदरम्यानची पाच ठिकाणे म्हणजे अक्कमहादेवी मंदिर, व्यंकटेश किनारा, अक्कमहादेवी गुहा, स्वामी प्रकटस्थान व बिल्ववन ही होत. यातील बिल्ववन हे स्थळ म्हणजे मार्कंडेय ऋषींनी जेथे तपश्चर्या केली, ते पवित्र ठिकाण असल्याचे मानले जाते. कर्दळीवन परिक्रमा करत असताना वृक्ष-वेली व जैव, घनदाट अरण्य, गुहा आदींचे दर्शन होते. कर्दळीवन परिक्रमेची सुरुवात साधारणपणे श्रीशैलम येथील श्रीमल्लिकार्जुनाचे व श्रीभ्रमरांबामाता देवीचे दर्शन घेऊन केली जाते. या सर्व भक्तिमय परिक्रमेत पाताळगंगेतूनदेखील प्रवास करावा लागतो. हा पूर्ण परिसर नदीच्या आसपासचा व घनदाट अरण्यात असल्यामुळे येथे पावसाळ्यात परिक्रमा करणे फार कठीण आहे. त्यामुळे भक्तगण साधारणतः नोव्हेंबर ते मे या सात महिन्यांच्या काळात कर्दळीवन परिक्रमा करताना आढळतात.

स्वामी समर्थ जेथून प्रकट झाले, त्या कर्दळीवनाची आपण थोडक्यात माहिती घेतली. परंतु श्रीस्वामी समर्थ प्रकट झाले, तेव्हाचे त्यांचे वर्णन करणे आवश्यक आहे. श्रीस्वामी समर्थांचा वारुळातून बाहेर पडलेला देह म्हणजे दैवी स्वरूपाचा होता याची प्रचिती त्यांच्या शरीराचे वर्णन केल्यावर येते. स्वामींची उंची सहा फुटांपेक्षा जास्त होती व ते आजानुबाहू होते. आजानुबाहू या शब्दाचा अर्थ ज्याचे हात गुडघ्यापर्यंत पोहोचतात असा होतो. अशी व्यक्तिमत्वे फार विरळीच असतात. भारतीय परंपरेचा विचार केला तर असे म्हटले जाते की, श्रीरामाचे हात गुडघ्यापर्यंत पोहोचत होते म्हणजेच तो आजानुबाहू होता. याचप्रमाणे अनेक जैन तीर्थंकरांच्या मूर्ती वा शिल्पं पाहिल्यावर जाणवते की, ते आजानुबाहू होते. तसेच शिर्डीचे साईबाबा, गजानन महाराज व रामकृष्ण परमहंस या महान विभूतीसुद्धा आजानुबाहू होत्या असे म्हटले जाते. इसवीसनपूर्व सहाव्या शतकात बौद्ध धर्माची स्थापना करणारे महात्मा गौतम बुद्ध हेदेखील आजानुबाहू होते. तर महान पुरुष मंडळींमध्ये आढळणारे बत्तीस गुण

---

जीवन हे कमळ आहे. ते सुखाच्या रात्री उमलते आणि दुःखाच्या रात्री कोमेजते.

गौतम बुद्धांच्या ठायी होते असे म्हटले जाते. या बत्तीस गुणांपैकी काही गुण पुढीलप्रमाणे आहेत– पायांवर हजार खऱ्या असणारे चक्र, लांबसडक बोटे, मोठ्या टाचा, हरणाप्रमाणे मांड्या, गुडघ्यापर्यंत (गुडघ्याच्या खालपर्यंत) पोहोचणारे हात– आजानुबाहू, प्रत्येक केसाचे मूळ काळे असणे, सोनेरी रंगाचे शरीर वा कांती, ताठ व सरळ शरीर, प्रबळ-मजबूत खांदे, चाळीस दात, चार सुट्यांचा रंग पांढराशुभ्र, सिंहासारखा जबडा, कुठल्याही अन्नाला वा पदार्थाला चविष्ट बनविणारी लाळ, लांब व रुंद जीभ, खोलीतील व निनादणारा आवाज, निळे डोळे, शाही ऋषभासारख्या डोळ्यांच्या पापण्या इत्यादी. हे झाले महान पुरुषांच्या बत्तीस गुणांपैकी काही गुण. स्वामी समर्थांमध्ये यातीलच गुण होते व त्यांची शरीररूपी मूर्ती पाहिल्यावर ते दैवीपुरुष आहेत याचा अनुभव येत असे. त्यांची उंची सहा फुटांपेक्षा जास्त होती, आजानुबाहू होते, छाती रुंद, खांदे मजबूत व चेहऱ्यावर सतत तेज असे. मोठे कान, टोकदार नाक व सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भेदक नजर होती. त्यामुळे स्वामींच्या संपर्कात येणारे लोक व भक्तगण निव्वळ त्यांच्या दर्शनामुळे मंत्रमुग्ध होत असत.

तर आपला मूळ मुद्दा असा होता की, एका वृक्षाखालील वारुळावर लाकूडतोड्याने आपल्या कुऱ्हाडीने घाव घातला, तेव्हा त्यातून स्वामी समर्थ प्रकट झाले. स्वामींच्या मांडीतून होणारा रक्तस्राव पाहून लाकूडतोड्या घाबरला व तो स्वामींकडे दयेची याचना करू लागला. स्वामींनी त्या लाकूडतोड्यास माफ केले. लाकूडतोड्याचा घाव वारूळावर पडणे हा काही योगायोग नसून ती साक्षात दत्तगुरूंचीच इच्छा असावी. याचे कारण म्हणजे त्यांना जगत्उद्धारासाठी एकोणिसाव्या शतकात अवताररूपाने भारतवर्षात आगमन करावयाचे होते असे म्हणणे संयुक्तिक ठरेल.

स्वामी समर्थ कर्दळीवनात प्रकट झाले व त्यानंतर त्यांनी जवळपास संपूर्ण भारतभर भ्रमण केले. असे म्हटले जाते की, स्वामी आपल्या भ्रमंतीत चीन, तिबेट व नेपाळपर्यंत गेले होते. त्याचप्रमाणे त्यांनी पुरी, वाराणसी (काशी), हरद्वार, गिरनार, काठीयावाड व रामेश्वरमपर्यंतचा प्रवास केला होता. शके १७६० म्हणजेच इसवीसन १८३८ च्या आसपास स्वामींचे मंगळवेढ्यास आगमन झाले. मंगळवेढा हे ठिकाण दक्षिण महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण आहे. मंगळवेढा सोलापूर जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणापासून पश्चिमेला साधारणपणे ५५ किलोमीटर एवढ्या अंतरावर तर पंढरपूरच्या आग्नेयेला २५ किलोमीटर अंतराच्या आसपास आहे.

स्वामींनी त्र्यंबकेश्वर येथे शिर्डीचे साईबाबा व शेगावचे गजानन महाराज यांना दीक्षा दिली होती असे म्हणतात. स्वामी समर्थांच्या आजानुबाहू शरीराविषयी आपण बघितलेच आहे. त्यांच्या स्वभावाविषयी बोलायचे झाले, तर ते स्वभावाने खूप कडक होते. त्यांना राग येत असे व ते शीघ्रकोपी होते असे म्हटले जाते. त्यांच्या या अशा तापट स्वभावामुळे लोक त्यांना घाबरून असत. स्वामींना भस्मलेपन करणे आवडत असे. तसेच त्यांना मुगाची कडबोळी व बेसनाचे लाडू आवडत असत असे आपल्या वाचनात येते. त्यांच्या आवडत्या प्राण्यांविषयी म्हणावयाचे झाले, तर त्यांना गाय व कुत्रा हे प्राणी आवडत असत. दत्त संप्रदायात या दोन प्राण्यांचे फार महत्त्व आहे. आपण श्रीदत्तगुरूंच्या तसबिरी पाहिल्या, तर त्यांच्या आसपास गाय व कुत्रा असल्याचे दिसते. स्वामी समर्थांचा महिमा फार दूरपर्यंत पोहोचलेला होता. त्यामुळे त्यांचे दर्शन घेण्यासाठी रीघ लागलेली असे. हे भक्तगण विविध भागांतून आलेले असत. असे म्हटले जाते की, साधारणपणे एक ते दीड हजार लोक प्रत्येक दिवशी त्यांचा उपदेश ऐकण्यासाठी व दर्शनाचा लाभ घेण्यासाठी येत असत. दत्तसंप्रदायाचा

प्रसार करण्यात स्वामी समर्थांचे अभूतपूर्व योगदान आहे. स्वामींचा भक्त परिवार फार मोठा होता. आजही स्वामींच्या भक्तांची संख्या असंख्य आहे. त्या काळी स्वामींच्या लाडक्या भक्तांमध्ये बाळाप्पा व चोळप्पा या भक्तांचा अग्रक्रम होता. स्वामींचे या दोहोंवर विशेष प्रेम होते असे म्हटले जाते. अक्कलकोट येथे स्वामींची समाधी व पादुका आहेत.

जरी अक्कलकोट हे स्वामी समर्थांचे स्थान होते व त्यांनी तेथे समाधी घेतलेली असली तरी त्यांचे भक्तगण संपूर्ण महाराष्ट्रभर आहेत. आज मुंबई ठाण्यासारख्या शहरांमध्येही स्वामींचे अनेक मठ आहेत. या मठांमध्ये भक्तगण मोठ्या श्रद्धेने स्वामी दर्शनासाठी जात असतात. स्वामी समर्थांचे एक शिष्य वामनबुवा ब्रम्हचारी यांनी 'गुरुलीलामृत' हा ग्रंथ लिहिला होता. हा ग्रंथ स्वामिभक्तांना फार प्रिय आहे. या ग्रंथातून स्वामींविषयी व त्यांच्या उपासनेविषयी महत्त्वाची माहिती मिळते. वामनबुवा ब्रम्हचारी हे अहमदनगर जिल्ह्यातील वांभोटी या गावी राहात असत.

आपण येथे शिर्डीच्या साईबाबांच्या व शेगावच्या गजानन महाराजांचा उल्लेख केला. तसे पाहिले, तर साईबाबा हे फकीर होते. परंतु काही दत्तभक्त त्यांना दत्तात्रेयांचा अवतार मानतात. साईबाबांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे हिंदूप्रमाणे मुस्लीमदेखील भक्त आहेत. दासगणू हे एक महान दत्तभक्त होऊन गेले. या दासगणूंनी साईबाबांचा उल्लेख 'पंढरीचा विठ्ठल' असा केलेला असल्याचे आपल्या वाचनात येते. साईबाबांचा निवास शिर्डीतील एका पडक्या मशिदीत असे. या मशिदीचा उल्लेख 'द्वारकामाई' असा केला जातो. साईबाबा आपला उदरनिर्वाह भिक्षा मागून करत असत. तसेच ते गोरगरिबांसाठी व पददलितांसाठी भंडारा घालत असत. शिर्डी हे ठिकाण अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यात आहे. साईबाबांनी १९१८ साली शिर्डीत समाधी घेतली. साईबाबांची ओळख असणारे वाक्य म्हणजे 'सबका मालिक एक है' हे होय.

गजानन महाराजांविषयी सांगावयाचे झाले तर, यांचे वास्तव्य शेगाव येथे होते. शेगाव हे ठिकाण महाराष्ट्रातील बुलडाणा जिल्ह्यात आहे. शेगाव हे गाव मुंबई-नागपूर लोहमार्गावरील स्टेशन आहे. असे म्हटले जाते की, १८७८ ते १९१० दरम्यान गजानन महाराजांचा निवास शेगाव येथे होता. गजानन महाराजांविषयी माहिती मिळण्याचा एक प्रमुख स्रोत म्हणजे दासगणू यांनी लिहिलेला 'गजानन विजय' हा ग्रंथ होय. गजानन महाराजांची मुख्य ओळख म्हणजे त्यांचा 'गण गण गणात बोते' हा मंत्र होय. गजानन महाराजांची समाधी शेगावला आहे. गजानन महाराजांनी १९१० साली आपला अवतार संपविला. आजही शेगावला त्यांच्या भक्तगणांची रीघ लागलेली असते. शेगाव धर्म संस्थानात भाविकांच्या उतरण्यासाठीची उत्तम सोय केलेली आहे.

स्वामी समर्थ जेव्हा अक्कलकोटला आले, तेव्हा श्रीमंत मालोजीराव हे तेथील गादीवर बसलेले होते. हे मालोजीराजेदेखील स्वामींचे भक्त होते. स्वामी समर्थांना दिगंबर बुवा असेदेखील म्हणत असत. स्वामी जरी स्वभावाने कडक व रागीट असले, तरी त्यांचे भक्तांवर विलक्षण प्रेम असे. स्वामी समर्थ म्हणजे आधुनिक काळातील चमत्कार होय असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्यांनी अक्कलकोट निवासी अनेक लीला केल्याचे व भक्तांवरील संकटे दूर केल्याचे वाचनात येते. स्वामींच्या शिष्य मंडळींमध्ये पुढील काही महत्त्वाच्या विभूतींचा समावेश होतो- पुण्याचे बिडकर महाराज, मुंबईचे श्रीकांत महाराज, कोल्हापूरचे कुंभार स्वामी, आळंदीचे श्रीनृसिंहसरस्वती. स्वामींचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते जात-धर्म न पाळता समाजातील विविध घटकांमध्ये वावरत असे व ते सर्वांना आपल्या कृपेचा प्रसाद देत असत.

(पृष्ठ क्र. २७ वर)

# व्रत
## (भाग – २)

*या लेखात वन्य जीवनाविषयी सखोल माहिती देण्यात आली आहे – संपादक*

**डोंगरयेल्या आणि वाश्या**

गुरुवार दिनांक २१ ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी १० वाजता मला अजय सोमा मसराम याचा फोन आला. त्या वेळी मी घरात टिपिकल सकाळची आवराआवर करत होतो. मला अजय म्हणाला –

''दादा, दादा, लवकर या. साप निघाला आहे. माझ्या गाडीवर बसलाय. आमच्या घराच्या समोरच. लगेच या दादा!''

मी सर्पकाठी आणि कापडी पिशवी हाताला लागली नाही म्हणून उशीचा अभ्रा घेऊन धावतपळत निघालो. अजयच्या घराच्या समोर त्याची मोटरसायकल लावलेली होती. मोटरसायकलच्या हँडलमधून एका सुरेख, सडपातळ सापानं त्याचं डोकं आणि मान बाहेर काढली होती. हा डोंगरयेल्या किंवा रूका सर्प [Bronze-backed Dendrelaphis tristis (Daudin, 1803] होता. सापाचं बाकीचं अंग पेट्रोलच्या टाकीवर असलेल्या लोखंडी झाकणाच्या खाली होतं. हा साप जनुल योगेश मडावी या गावातल्या लहान मुलाला पहिल्यांदा दिसला. मी सर्पकाठीच्या मदतीनं सापाला उचलण्याचा प्रयत्न केला. तो तोंडाकडून न वळता शेपटीकडून मागे-मागे जात अंग चोरत लोखंडी झाकणाच्या खाली गेला. हेतराम सोमा मसरामनं किल्ली वापरून सीटकव्हर उचललं. सुमारे ३ फूट लांबीचा, सुंदर साप सीटच्या खाली वेटोळं करून बसलेला होता. त्यानं त्याचं डोकं किंचित वर उचललं होतं. मी तो घाईघाईत पकडला आणि नंतर नीट पकडता येईल म्हणून वाळूच्या ढिगावर सोडला. मात्र खूप जोरात सळसळत वाळूच्या ढिगावरून तो पुढे बांबूच्या कुपाटीमधून पावसाळी झुडपांच्या दाटीत घुसला. आता काही तो हाताला लागणार नाही असं वाटल्यामुळे जमलेल्या वीस-पंचवीस लोकांनी त्याचा नाद सोडला. लोकांमध्ये पांगापांग सुरू होणार, तेवढ्यात मला तो दिसला. लोकांची भीती कमी व्हावी म्हणून मला तो दिसला आहे, असं मी मुद्दाम त्यांना सांगितलं. मी त्याला सर्पकाठीवर घ्यायच्या तयारीत असताना तो सुळकन पुढे गेला आणि एका सीताफळाच्या झाडावर चढला. हा प्रामुख्यानं वृक्षनिवासी साप असल्यामुळे तो जेव्हा झाडावर चढला, तेव्हा त्याला घरी आल्यासारखं वाटलं असावं, असं मला वाटलं. तिथे सीताफळाची ओळीनं तीन-चार झाडं होती. यानंतर हेतराम सीताफळाच्या झाडावर चढला. त्याच्या हातात लांबलचक सुका बांबू होता. त्यानं सापाला जमिनीच्या दिशेनं यायला भाग पाडायचं आणि नंतर मी त्याला पकडायचं असं ठरलं. मात्र साप सतत हुलकावण्या देत राहिला. थोड्याच वेळात, तो सुमारे २० फूट उंचीच्या एका मोवईच्या किंवा शिमटीच्या झाडावर चढला. तो ओझरता जरी दिसला, तरी आगीत तेल टाकल्यावर जसा भडका उडतो, तसा बघ्यांचा गोंगाट वाढत होता.

'तो पाय, तो पाय, तो तो!'

'डोंगरयेल्या आये!'

'तो पाय, तो पाय दादा, तो वर गेला!'

'त्या लहानसुल्या खांद्यावर आये!'

'तो आला, तो आला, खाल्या आला. दादा धर त्याला. दादा धर!'

अशा भसाड्या आवाजातल्या सूचना-वजा वाक्यांनी सापाचा परिसर लोकांनी दणाणून सोडला. शेवटी या सापाला बांबूच्या मदतीनं झाडावरून डावीकडच्या बाजूला, वनकर्मचारी वसाहतीच्या भिंतीच्या बाजूला पाडायचं असं ठरलं. मला ते जमलं. हेतरामपेक्षा मी ते जास्त प्रेमानं केलं. तो भिंतीच्या कडेला पडला. खरं तर आता त्याला पकडणं सोपं होतं. कारण तो उघडा पडला होता. नीट दिसत होता. आजूबाजूला कुठेही झाडंझुडपं नव्हती. पण तरीही तो सटकला. भिंतीच्या खाली असलेल्या भोकात शिरला. मी मुद्दाम वनकर्मचारी वसाहतीत जाऊन पाहिलं. आजूबाजूची झाडंझुडपं तपासून पाहिली. पण कुंपणभिंतीला असलेल्या फटी, छिद्रं, भोकं आरपार नव्हती, पोकळ नव्हती. याचा अर्थ तो भिंतीच्या आत असलेल्या कुठल्या तरी पोकळ सांदीत खूप आत जाऊन बसला होता. तो आता लवकर बाहेर येणार नाही हे लक्षात आल्यावर गारुड्यानं खेळाची जागा बदलण्यासाठी सापांच्या टोपल्या झाकायला सुरुवात केली, की जशी बघ्यांची गर्दी ओसरते, तसे लोक इकडेतिकडे पांगले.

कल्पना करा, आपल्या गाडीवर एक जगावेगळा पॅसेंजर बसला आहे याची कल्पना नसताना अजयनं बाहेर जायचंय म्हणून गाडीवर बसून गाडी सुरू केली असती तर...

माझ्या अपेक्षेप्रमाणे गावातली काही लहान मुलं मात्र कोत्याच्या माश्यांसारखी चिवटपणे साप दिसला त्या ठिकाणी उभी होती. तेवढ्यात एक डोंगरयेल्या कमी होता म्हणून की काय, प्रशांत संजय वाढवे या चिमुरड्याला एक वाश्या* [Buff-striped Keelbabk *Amphiesma stolatum* (Linnaeru, 1758)] साप दिसला. (या सापाला हिंदी भाषेमध्ये 'सीतेकी लट' असं सुंदर नाव आहे.) मी त्यालाही पकडण्याचा प्रयत्न केला. पण तोही सटकला. भिंतीच्या बुडाशी असलेल्या एका बिळात घुसला. वाश्या साप दिसला तेव्हा लक्ष्मी ऊर्फ अक्षरी उमेश वाढवे हिला एका बेलाच्या झाडावर मधल्या बोटाएवढ्या जाड फांदीला पकडून विश्रांती घेणारं तपकिरी नरेश (Indian Tawny Rajah) हे सुंदर फुलपाखरू दिसलं. मी घाईघाईत घरी जाऊन कॅमेरा आणला आणि पंख मिटून बसलेल्या फुलपाखराचे काही फोटो काढले.



(*बेडूक आणि भेक (toad) अशा उभयचर प्राण्यांवर गुजराण करणारा, धराजीवी (terrerrtial), दिनचर (diurnal) असा वाश्या किंवा नानेटी हा बिनविषारी साप आमच्या गावात दिवसाच्या कोणत्याही वेळेला कुठेही दिसतो. हा साप मासे, गांडुळं आणि पालीही मारून गिळतो अशी नोंद आहे. गावात कधीही, कुणीही त्याला मारत नाही. त्यामुळे आणि योग्य अधिवासामुळे त्याची संख्या भरपूर आहे.)

त्यानंतर मी चैतराम किसन टेकाम याच्या मालकीच्या खऱ्याच्या ठेल्यावर कॅमेरा ठेवला आणि पुन्हा बेलाच्या झाडाजवळ जमलेल्या मुलांपाशी आलो. त्यानंतर मी सात-आठ मुलांना हाताशी धरून पावसाळी पाटांमध्ये अडकलेला कचरा गोळा केला. त्यात प्लास्टिक, पत्रा, काच, थर्माकोल आणि लोखंड होतं. मी मुलांसारखाच कुठेही हात घालून कचरा गोळा केला.

जो चमत्कारांची अपेक्षा करीत असतो त्याला (होतकरू!) टीकाकार म्हणतात.

हे दृश्य गावातल्या काही लोकांनी बघितलं आणि ते पटकन आपापल्या घरी गेले. त्यांना कदाचित लाज वाटली असावी. आम्ही सगळ्यांनी मिळून दोन पोती भरतील एवढा कचरा गोळा केला. याच कचऱ्यातून वेगवेगळ्या जातींच्या पाली, सरडे, सापसुरळ्या आणि डोंगरयेल्या, वाश्या, मुकी मांडवल [Common Sand Boa Gongylophis conicus (Schneider, 1801)], विरुळा किंवा धोंड्या [Checkered Keelbabk Fowlea piscator (Schneider, 1799)] हे साप फिरताना दिसत होते. छोटे छोटे बेडूक उड्या मारत होते. अविघटनकारी कचऱ्यातून या सगळ्या जिवांची आम्ही मुक्तता केली. कचऱ्याच्या डचक्यामुळे काही ठिकाणी अडून राहिलेलं पाणी पुढे सरकलं.

**चित्रकपोताचं पिल्लू**

गुरुवार दिनांक २१ ऑक्टोबर २०२१ रोजी दुपारी २.३० वाजता मी घरात बसून लिखाण करत होतो. तेवढ्यात दाराच्या बाहेरची घंटा वाजली. मी दार उघडून बाहेर आलो. चिराग राजकुमार उईके हा पिटेझरी गावातला मुलगा हातामध्ये चित्रकपोत किंवा ठिपकेदार होला (Spotted Dove) या पक्ष्याचं पिल्लू घेऊन आलेला दिसला. गोंड आदिवासी मुलींनी आणि महिलांनी बनवलेल्या कापडी पिशव्या आणि कापडाच्या इतर वस्तू पाठवण्यासाठी आम्ही वापरतो त्या पुठ्ठ्याच्या खोक्यात पिल्लाला ठेवून दे असं मी चिरागला खुणेनं सांगितलं. चिराग एकटा नव्हता. त्याच्याबरोबर गावातली पाच-सहा मुलं होती. सगळे जण या घटनेचे साक्षीदार होते. कामाच्या गडबडीत होल्याच्या पिल्लाकडे मी सतत बघू शकलो नाही. पण त्याची गरजही नव्हती हे लक्षात आलं. पिल्लाला काहीही झालेलं नव्हतं. ते चांगलं टुणटुणीत होतं. ज्या खोक्यात त्याला ठेवलं होतं, ते खोकं अर्ध झाकेल असा एक टॉवेल मी त्याच्यावर टाकला. पिल्लू खोक्यात तीन-चार ठिकाणी शिटलं होतं. याचा अर्थ, माझ्या ताब्यात येण्यापूर्वी त्याला त्याच्या पालक पक्ष्यांनी व्यवस्थित भरवलं होतं. रात्रभर पिल्लू खोक्यातच होतं.



मी सकाळी उठून पाहिलं, तर ते खोक्यातल्या खोक्यात कोवळ्या उन्हाची तिरीप पकडून छानपैकी पिसं साफ करत बसलं होतं. आज सकाळी मी निर्णय घेतला, की पिल्लाला ताबडतोब सोडून द्यायचं. म्हणून घराच्या बाहेर पडलो. चिरागनं पिल्लू जिथून उचललं होतं, ती जागा मी नीट तपासून पाहिली. पावसाचं पाणी वाहून जाण्यासाठी रस्त्याच्या कडेला तयार केलेल्या सिमेंटकाँक्रिटच्या पाटात महेश्वरी जगदीश टेकाम या इयत्ता चौथीतील मुलीला पहिल्यांदा हे पिल्लू दिसलं. पिल्लू उडत तर नाहीये, त्याला काही झालं तर काय करणार? असं तिला वाटलं. पाण्याचा पाट अगदी स्वच्छ होता. त्यात एक थेंबसुद्धा पाणी नव्हतं. सीताफळ, काशिद, पानांचा अशोक या झाडांची पानं पाटात पडली होती. ज्या ठिकाणी पिल्लू पडलेलं होतं, त्या जागेच्या वर कुठेतरी झाडावर चित्रकपोताचं घरटं असावं असा माझा अंदाज होता म्हणून मी वर पाहिलं. जमिनीपासून सुमारे १२ फुटांवर झाडाचं खोड तोडलं होतं. तुटलेल्या खोडाच्या सर्व बाजूंनी फुटलेल्या नवीन फांद्यांमुळे तयार झालेल्या एका सुरक्षित अशा बेचक्यात होला घरटं करू शकेल अशी जागा तयार झाली होती. मी मुलांच्या मदतीनं शिडी मागवली आणि पिल्लाला घेऊन आलो.

आनंदराव निताराम कोवे मोठ्या उत्साहानं शिडीवर चढले. त्यांनी अशोकाचा तो दुबेळका हात घालून चाचपून पाहिला. पण तिथे घरटं नव्हतं. तिथे सुकलेल्या काड्याकाटक्या आणि पानं अडकून राहिली होती.

मग मी पिल्लाला घेऊन घरी आलो. पिल्लाच्या विष्ठेमुळे खराब झालेलं खोकं बदलून नवीन खोकं घेतलं आणि त्यात पिल्लाला ठेवलं. माझ्या हातात असताना पिल्लू उडायचा प्रयत्न करत होतं. पायांनी माझ्या हातांना रेटा मारत होतं, जोर लावत होतं. पिल्लू फारच गोड होतं. त्याच्या दोन्ही पंखांवर असलेल्या पिवळसर-तपकिरी रंगांच्या ठिपक्यांवरून ते चित्रकपोत या पक्ष्याचं पिल्लू होतं, हे लगेच कळत होतं. गावातल्या माझ्या माहितीतल्या सर्वांत लहान मुलालाही हे पिल्लू कोणत्या पक्ष्याचं आहे, हे ओळखता आलं. पिल्लाच्या संपूर्ण पिसाऱ्यांतून, विशेषतः डोकं आणि मान या भागांतून पिवळ्या आणि पांढऱ्या रंगांचे कुरळे तंतू दिसत होते. हे परांचे (कोमलपिच्छ – down feather) तंतू होते. ते केसांसारखे दिसत होते. परांना हटवून उगवून आलेल्या नवीन पिसांचा कोट पिल्लाच्या अंगावर चढला होता. पिल्लाच्या दोन्ही पंखांची पूर्ण वाढ झाली होती.

उन्हाच्या झळा लागू नयेत म्हणून मी पिल्लाचं खोकं घरात आणून ठेवलं. डोळ्यांसमोर हवं म्हणून लिखाणाच्या टेबलावर ठेवलं. मग मी गावातल्या मुलांबरोबर बाहेर पडलो. आम्ही गावातून एक फेरी मारली. अरुण रणजित शिरसाम या मुलाला वनकर्मचारी वसाहतीच्या कुंपणभिंतीला खेटून वाढलेल्या एका चिंचेच्या झाडावर चित्रकपोताची हालचाल दिसली होती. म्हणून त्या झाडाची जमिनीवर ओणवलेली फांदी आम्ही तपासून पाहिली, पण काही दिसलं नाही. चिंचेच्या शाखा-उपशाखांची वीण हातरीसारखी घट्ट असते. त्यामुळे जमिनीवर उभं राहून काहीही दिसत नव्हतं. म्हणूनच घरट्याचा तुटपुंजा फलाट रचण्यासाठी त्या पक्ष्यानं चिंचेच्या झाडाची निवड केली होती. मला अरुणचं खूप कौतुक वाटलं. गावातल्या शाळेत जाता-येता त्यानं किती सहजपणे कवड्याचं निरीक्षण केलं होतं. केवलराम गुजर उईके यांच्या दारात असलेल्या एका पानांच्या अशोकालाही आम्ही भेट दिली. पण झाडावरच्या भरघोस पर्णसंभारात नेमकं कुठे शोधायचं हे कळलं नाही. सध्या पिल्लं असलेलं कवड्याचं घरटं शोधून काढायचं आणि त्यात हे पिल्लू सोडायचं असा माझा प्रयत्न होता. गावातल्या माझ्या बालमित्रांनी त्यांच्या परीनं केलेल्या प्रयत्नांना दाद द्यायची म्हणून मी त्यांना भाजलेल्या सफेद शेंगदाण्यांचा खाऊ दिला.

शाळेची घंटा झाली, तशी पोरं पळाली. सगळीकडे सामसूम झाल्यावर मी पिल्लाला ते जिथे सापडलं होतं, त्याच जागेवर नेऊन सोडलं. मोकळं सोडून दिल्यानंतर पुढच्याच क्षणाला पिल्लानं काय केलं असेल? त्यानं 'चीऽऽ' असा खाद्याची मागणी करणारा कापरा आवाज काढायला सुरुवात केली. याचा अर्थ या पिल्लाला अजूनही त्याचे पालक भरवत होते. पिल्लू अजूनही पालकांच्या सहवासात राहात होतं. मी काही वेळ पकडून ठेवल्यामुळे विस्कटलेली पिसं एकसारखी करण्यासाठी पिल्लानं त्याचं अंग झडझडवलं. मान ताणून आळस दिला. त्याच्या कोवळ्या डोळ्यांनी भोवताल पाहून घेतला. गंमत म्हणजे, माणूस किती धोकादायक असतो हे या पिल्लाला अजिबात माहीत नव्हतं. माणसाच्या विरुद्ध त्याच्याकडे कोणताही बचाव नव्हता. माणसापासून स्वतःला वाचवण्यासाठी काय करायचं असतं हे या पिल्लाला अजिबात कळत नव्हतं. म्हणून तर त्यानं स्वतः जखमी झालेलं नसतानासुद्धा गावातल्या मुलांना जवळ येऊ दिलं, पकडू दिलं. बांबूच्या कुपाटीवर बसलेल्या पिल्लाचे फोटो काढण्यासाठी मी उगीचच टेलिफोटो लेन्स वापरली असं मला वाटलं. पिल्लानं मला फोटो काढत असताना बऱ्यापैकी जवळ येऊ दिलं. पिल्लाला सोडून दिल्यानंतर

सुमारे तासाभरानं मी पुन्हा त्या जागेवर गेलो. तिथे पिल्लू नव्हतं. या एका तासाच्या कालावधीत पिल्लाला कोणत्याही प्रकारचा त्रास झाला नाही. त्याला कोणीही बिचकवलं नाही. पिल्लाची आणि त्याच्या पालक पक्ष्यांची गाठभेट झाली असावी असा आशादायक विचार माझ्या मनात आला.

**सापांचा सुळसुळाट**

शनिवार दिनांक २३ ऑक्टोबर २०२१. स्थळ : पिटेझरी गाव. मी माझ्या रिवाजाप्रमाणे सकाळी उठून पिटेझरी गावाच्या तळ्यावर प्राणायाम करण्यासाठी जात असताना, संजय हरिश्चंद्र वाढवे या मित्राचा फोन आला.

संजूभाऊ म्हणाला -

'दादा, लवकर या. चिमनीच्या घरट्यात साप धसला आहे. चिमनी घरट्याच्या अंदर जात नाईये. साप अंदर आये घरट्यात. लवकर या!'

मी संजूला म्हटलं -

'तुम्ही गडबड करू नका. शांत राहा. सापाला मारू नका. मी लगेच येतो!'

साप कोणता असेल, कसा पकडता येईल याचा विचार करत मी निघालो. धानाच्या बांध्यांच्या धुऱ्यांवरून चालताना कमरेत वाकलेल्या भातरोपांवर आणि गवताच्या पात्यांवर साचलेलं दवाचं गार पाणी माझ्या पायाला गुदगुल्या करत होतं. त्यामुळे माझा चालण्याचा वेग आपोआप वाढला. घरी आलो, सर्पकाठी उचलली आणि तेजराम हरिराम उईकेच्या घरी पोहोचलो. तिथे दहा-बारा लोकं आधीच जमले होते.

मी जमावाकडे बघत विचारलं,

'कुठे आहे साप?'

दारातल्या आंब्याच्या झाडाकडे बोट दाखवत कृष्णा हरिश्चंद्र वाढवे म्हणाला -

'त्या गोद्यात जाऊन बसलाय. आत्ता टोंड भायेर काडला होता तेना!'

मी झाडावर पाहिलं. या झाडावर जमिनीपासून सुमारे १० फुटांवर शीतल तेजराम उईके या तरुणानं लाकडाचं एक छोटं खोकं लटकवलं होतं. एका चिमणीच्या जोड्यानं त्याचा ताबा घेतला होता. चिमणीनं तीन वेळा अंडी घालून पिल्लं वाढवली होती. याच चिमणीच्या घरट्यात एक साप घुसला होता.

'तो पाय तो पाय. टोंड कहाडते!'

तेजराम माझ्या शेजारी उभा असूनसुद्धा इतक्या जोरात ओरडला, की गुराख्यानं काठी उगारताच एखादा बैल बुजावा; तसा मी दचकलो. तेवढ्यात खास झाडी बोलीतलं वाक्य कानांवर आलं.

'सरपकिटरू पकडना हा भस्बोड्या मानसाचा काम नोहे. मोट्या दिमाकानं काम करावा लागते!'



भस्बोड्या म्हणजे धांदरट.

घरट्याला समोरच्या बाजूनं असलेल्या भोकातून डोकावणारा साप मी ओझरता पाहिला. त्यावरून तो झाडांवर राहणारा रुका सर्प किंवा डोंगरयेल्या असावा, असा माझा अंदाज होता. कृष्णानं एक मोठी काठी घेतली आणि घरकुलाच्या खोक्यावर चांगले जोरात फटके मारले. त्यामुळे साप लगेच बाहेर आला. माझा अंदाज खरा ठरला होता. तो डोंगरयेल्या किंवा

रुका सर्पच होता. बाहेर पडलेला साप झाडावर फिरू लागला. फांद्यांवरून खाली-वर करू लागला. त्याला फटका न मारता, कोणतीही जखम न करता, अलगद खाली पाडायचं असं ठरलं. कृष्णानं पुढाकार घेऊन तसा प्रयत्न करून पाहिला. पण बासोड्याचा स्पर्श होताच साप पटकन पुढे सरकत होता. त्या सडपातळ सापाच्या शेपटीकडचा अरुंद भाग उचलून त्याला खाली पाडणं शक्य नव्हतं. एक क्षण असा आला, की साप एका डहाळीवरून दुसऱ्या डहाळीवर जाण्याच्या प्रयत्नात होता. त्या वेळी तो बराचसा अधांतरी होता. ही संधी साधून कृष्णानं त्याला खाली पाडलं. जमीन लागताच अंगात आल्यासारखे वळसे मारत साप भंगारात द्यायच्या सामानात शिरला. तिथे जन्मभराची अडगळ होती. काय काय उचलणार? तरीही केवळ साप होता म्हणून सुस्ती न करता तेजराम सामान उपसू लागला. मच्छरदाणी, लोखंडी डबे, लाकडाच्या फळ्या, प्लास्टिकच्या कागदाचे तुकडे, शेवाळलेल्या जुन्या विटा...

मी सर्पकाठीच्या आकड्यानं शेवटची फळी उचलताच स्वतःच्या शरीराची चुंबळ करून बसलेला साप दिसला. त्याला पकडण्याचा प्रयत्न करताच तो एक सामट पकडून बघत राहावं असा सळसळत गेला. मी त्याच्यामागे धावलो आणि माझा उजवा पाय अलगद त्याच्या शेपटीवर ठेवला. काहीतरी गडबड आहे हे सापाच्या लक्षात आलं. त्यानं त्याच्या अंगावरचे खवले फुलवून बहारदार निळ्या रंगाची शलाका दाखवली. तो खूप चिडला होता असा त्याचा अर्थ होता. डोकं आणि मान ताणून तो सटकायचा प्रयत्न करायला लागला. मग मात्र मी त्याला अलगद उचललं आणि मोकळ्यावर आणलं. जमलेल्या पंचवीस-तीस लोकांनी साप जवळून पाहिला.

या सापाविषयी शाळेतल्या मुलांशी बोलावं म्हणून मी तयारी केली. आज शनिवार असल्यामुळे सकाळची शाळा होती. मी साप घेऊन शाळेत गेलो. मुलांना खाली बसायला सांगितलं. बंदाच्या कापडी पिशवीत ठेवलेला साप बाहेर काढून मुलांना, शिक्षकांना आणि जमलेल्या गावकऱ्यांना



दाखवला. त्या वेळी सगळे मिळून सुमारे ६० लोक उपस्थित होते. मी मुलांशी बोलत असताना एक निरोप आला की, आम्ही सध्या बांधत असलेल्या पर्यटक निवासात 'दांडेकार' नावाचा साप आला आहे. पकडलेला रुका सर्प व्यवस्थित पिशवीत ठेवून ती पिशवी मी घरात थंड जागी ठेवली आणि धावतपळत पर्यटक निवासाकडे आलो. त्याचं बांधकाम सुरू होतं.

माझा मित्र ओमप्रकाश परसराम टेकाम मला म्हणाला -

'दादा, आत या. साप भिंतीवर चंगला आहे.'

मी पहिल्या खोलीत गेलो. प्रकाशनं मोबाईलचा टॉर्च लावून मला साप दाखवला. किरकोळ उजेडातही मी साप ओळखला. तो कवड्या [Common Wolf Snake Lycodon capucinus (F. Boie, 1827)] नावाचा बिनविषारी साप होता. जराशा खडबडीत भिंतीच्या लहानात लहान कंगोऱ्याचा आधार घेत, काटकोनात भिंतीवर चढायची त्याची सवय मला चांगलीच माहीत होती. पालींच्या शोधात घरात येणारा कवड्या नवख्या निरीक्षकाला छोट्या मण्यारीसारखा वाटू शकतो.

मी प्रकाशभाऊच्या हातात काठी दिली आणि त्याला सापाला खाली पाडायला सांगितलं. कारण दोन भिंतींच्या कोनात गुंडाळी करून बसलेला साप वर

चढून पकडणं हे जवळजवळ अशक्य होतं. प्रकाशनं सापाला साधा ओरखडादेखील पडणार नाही अशा बेतानं सुमारे ९ फूट उंचावरून खाली पाडलं. रबरी ट्यूब खाली पडल्यासारखा आवाज झाला. मी पटकन साप पकडला. हा डोंगरयेल्यासारखा चळवळ्या साप नव्हता. त्याला पकडल्यानंतर त्यानं डोकं आणि शरीर चपटं केलं आणि माझ्या मधल्या बोटाला चावला. तो मला चावला हे मी जमलेल्या लोकांना सांगितलं, तेव्हा त्यांचा विश्वास बसला नाही, इतक्या वेगात तो चावला. मला छोटा काटा टोचावा एवढ्याच वेदना झाल्या. तपकिरी रंगावर आडवे पांढरे पट्टे असलेला कवड्या सुमारे १ फूट लांबीचा होता. मी त्याला घेऊन घरी आलो.

दोन्ही साप माणसांमध्ये, माणसं असताना दिसले हे एक प्रकारे बरं झालं. कारण त्यामुळे माणसाला शहाणं करण्याची संधी मला मिळाली. दोन्ही साप यथावकाश मी त्यांच्या नैसर्गिक अधिवासात, मनुष्यवस्तीपासून दूर सुखरूप सोडले. आसपास दगडांवरच्या, झाडांवरच्या पाली, सापसुरळ्या, सरडे आणि बेडूक यांची हालचाल आहे, याची खात्री करून घेतली.

आम्ही एका मोठ्या जंगलाच्या अंगणात असलेल्या निसर्गसमृद्ध खेड्यात सुमारे ६२० लोक आणि शेकडो पशुपक्ष्यांबरोबर राहतो. निसर्गाचा सांभाळ करण्यासाठी, पशुपक्ष्यांची सुटका करण्यासाठी आम्हांला बाहेर जावं लागत नाही. सर्व घटना आमच्या आसपासच घडत असतात. आमच्या दिनक्रमात वेळेच्या भरपूर खिडक्या सताड उघड्या असतात. कुठल्या न् कुठल्या खिडकीतून अधूनमधून एखादी तरी संधी सळसळत आत येते आणि आमचा दिवस वळसे घालू लागतो. कात टाकलेल्या सापासारखा!

**शब्दांचे अर्थ**

कोहोकाडा - गोंगाट, सरिसृप (संस्कृत) - साप, तुंदपरिमृज (संस्कृत) - अजगर, चिट्टी (चित्ती) - अजगर, दांडेकार - मण्यार (Common Krait), सामट - अरुंद वाट, मोवई - एक पानझडी वृक्ष Lannea coromandelica [Houtt.] Merr., सनान् - वेगात.

**- किरण वसंत पुरंदरे**
मोबाईल नं. ९७६५८१८८२५

•••

(पृष्ठ क्र.२० वरून - **भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे!**)

**संदर्भ ग्रंथ**

- अक्कलकोट श्रीस्वामी समर्थ महाराजांची आद्य बखर- विवेक दिगंबर वैद्य (संशोधन व संपादन)
- दारिद्र्य, दुःख, संकटनाशक श्रीदत्त उपासना- प्रिया मालवणकर
- कर्दळीवन एक अनुभूती- प्रा. क्षितिज पाटुकले
- श्रीदत्त परिक्रमा- प्रा. क्षितिज पाटुकले
- श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत- मूळ ग्रंथरचना- श्री. शंकर भट- अनुवाद- श्री. हरिभाऊ जोशी निटुरकर

**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email : subhashinscotland@gmail.com

•••

# अडलंय का?

*‘अडलंय का?‘ आणि ‘लव्ह यू’ या दोन नाटकांचे परीक्षण या लेखात दिले आहे - संपादक*

स्विस कॉन्सुलेट जनरल इन मुंबई व ग्योयथं इन्स्टिट्यूट मॅक्स म्युलर भवन पुणे यांच्या सहयोगाने, चार्ल्स लेवेन्स्की लिखित, निपुण धर्माधिकारी दिग्दर्शित ‘अडलंय का?’ या नाटकाचा पहिलाच, शुभारंभाचा प्रयोग पहिला. चार्ल्स लेवेन्स्की या स्विस जर्मन पटकथा लेखकाच्या ‘Die Besetzung’ या जर्मन नाटकाचा मराठी अनुवाद सौरभ चांदोरकर याने केला व अनुवादित ‘अडलंय का?’ मध्ये योआखिम अलब्रेष्ट ही भूमिका अतुल पेठे यांनी केली तर मिस पॉला फॉलमर ही भूमिका पर्ण पेठे हिने केली.




नाट्यगृहात प्रवेश करण्यापूर्वी बाहेर ‘Annie get your gun’, ‘Pension Schr5ller’, ‘Voice of the Wall’ इ. पोस्टर्सच्या background मध्ये एक तरुण मुलगा सुंदर असं व्हायोलिन वाजवतो आणि तिथेच प्रेक्षकांसाठी नाटकाची वातावरण निर्मिती केली जाते. ते व्हायोलिनचे स्वर ऐकत नाट्यगृहात प्रवेश केल्यावर समोर रंगमंचावर एक दिवा एकदम डोळ्यात जातो. पडदा वर आहे. पण या दिव्यामुळे रंगमंचावरचं काहीच दिसत नाही आणि एक आंधळेपण येतं. हे सुद्धा प्रेक्षकांनी नाटकाचाच विचार करावा यासाठीच असावं!

या नाटकाची गोष्ट अशी की, एका गावात नगर पालिकेने नाट्यगृहाच्या खर्चात कपात सुचवलेली असते आणि याचा रिपोर्ट बनवण्यासाठी एका सल्लागार कंपनीच्या प्रतिनिधीची, ‘मिस पॉला फोलमर’ची नेमणूक केली असते व हे नाट्यगृह बंद करून विकायचा प्रस्ताव ती मांडते. ज्याचं हे नाट्यगृह घरच आहे असा योआखिम अलब्रेष्ट हा एक नाटकवेडा नट त्या ‘नाटक कंपनीत’ असतो व पॉलाला मीटिंग साठी तिथे बोलावतो. त्यानंतर त्या दोघांमध्ये जो संवाद होतो तो या नाटकात दाखवला आहे.

‘अडलंय का?’ मध्ये स्त्रीपात्र हे आकड्यांमध्ये बोलणारं, नोकरी/धंदा करणारं, प्रॅक्टिकल विचार करणारं, कठोर, शिस्तप्रिय असं आहे तर पुरुषपात्र हे कलाप्रेमी, ममत्त्व असणारं असं आहे.

पहिल्या सीन मध्ये, अतुल पेठे हातात बंदूक घेऊन एका खुर्चीवर बसलेले आहेत आणि पहिला dialogue घेताच प्रेक्षक तो खर्जातला भारी आवाज ऐकतात. समोर एका लेव्हलवर असलेली एक खुर्ची, आरोपीचा पिंजरा, वर एक झुंबर, मागे सोनेरी पडदे , स्टूल अशा गोष्टी दिसतात. पर्ण रंगमंचावर येते तेव्हा एका भांड्याला पाय लागतो आणि प्रेक्षक त्या आवाजाने दचकतात. खरंतर ते असतं

मत्सरातून जिज्ञासा निर्माण होते.

शिरस्त्राण- एका नाटकातल्या सैनिकाचं शिरस्त्राण. इथे कळतं की हे सर्व नेपथ्य नाटकाचं नेपथ्य आहे. पॉलाची अनपेक्षित अशी audience entry आणि संपूर्ण रंगमंचाचा केलेला वापर... संगीत तर उत्तम होतंच, पण त्यापेक्षाही प्रकाशयोजना ही प्रत्येक दृश्याला साजेशी होती. विशेषकरून रंगमंच दाखवताना क्षीण दिवे आणि नंतर केलेल्या प्रकाशयोजनेचाच वेगळा प्रयोग ज्यामुळे हे नाटक तांत्रिकदृष्ट्यासुद्धा उत्तम झालं आहे.

पुढे सुंदर चित्रांनी आणि अतुल पेठे यांच्या कमाल अभिनयाने 'Peterchen's Mondfahrt' या जर्मन परीकथेचं सादरीकरण तर खूप मस्त झालं. रिमोटनी पॉला समोर टेबल येतो, रिमोटने खुर्चीवरचं कापड खाली पडतं, त्यानंतर पुढे अलब्रेष्टला बंदुकीची गोळी लागून खाली पडलेलं झुंबर, पॉलाने ओढलेली सिगरेट, पॉला सोबत व तिच्या परिवारासोबत घडलेली भूतकाळातली गोष्ट सांगताना केलेला लाकडी पेटीचा वापर, मागे नाटकाचे कपडे ठेवलेला स्टँड व तिथला अलब्रेष्टचा सिन हे सर्व एकदम रसिकांना गुंतून ठेवणारं तर होतंच पण त्याचबरोबर आता पुढे काय होणार याची उत्कंठा कायमच होती. एक एक धक्का देत हे नाटक असं पुढे जातं की प्रेक्षकांना चक्क खिळवून ठेवतं... नाटक संपल्यावर प्रेक्षक पुढची ५-७ मिनिटे तसेच स्तब्ध बसून राहातात!

अतुल पेठे यांचा अभिनय, खर्जातला आवाज, रंगमंचावरचा वावर, लवचिकता, हावभाव, हे सगळंच अगदी तृप्त करणारं होतं. पर्ण पठे सुद्धा नाटकाचा किडा चावलेल्या या 'बाप' माणसासमोर काही कमी नाही!

या नाटकातल्या नाटकात आणि रंगमंच्यावरच्या रंगमंचावर जे काही घडतं ते खूप विचार करायला लावतं. मनोरंजनाचं उत्तम मध्यम, सामाजिक जाणीव, बुद्धीला खत-पाणी घालणं, चालना देणं, पात्रांना आणि त्यातून व्यक्तींना सर्वांगाने समजून घेणं, भाषा/ संस्कृती शिकणं, असे अनेक फायदे नाटकाचे आहेत. नाटक हे मनोरंजनाचं अस्सल मध्यम आहे असं मला वाटतं. आपल्याकडे घरबसल्या एका क्लिक वर सुद्धा मनोरंजन होऊ शकतच. पण नाटकात त्या त्या वेळी प्रेक्षकांनी दिलेली दाद ही जेव्हा नटांपर्यंत पोहोचते तेव्हा ते नाटक अजून खुलतं आणि रंगतं. त्यावेळी रंगमंच आणि प्रेक्षकगृह यामध्ये जो भावबंध असतो तो बाकी माध्यमांमध्ये तसा नसतो.

प्लॉट, अभिनय, नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत, हे सगळं जर पूर्णपणे चोख अशा रूपात बघायचं असेल तर नाटकाचा किडा चावलेल्यांनी आणि विशेषतः नाटकाचा किडा न चावलेल्यांनीही 'अडलंय का?' नक्की बघावं!

'अडलंय का?' च्या प्रयोगानंतर लगेचच दोन दिवसांनी 'लव्ह यू' चा प्रयोग पहिला. या दोन्ही नाटकांचा एकमेकांशी काहीच संबंध नाही व हे एकत्र लिहिण्याचं कारण असं की, ही दोन्ही नाटकं मूळ जर्मन भाषेत आहेत आणि त्याच्या मराठी अनुवादाचं सादरीकरण पाहिलं. दोन्ही नाटकांमध्ये पर्ण पेठे हिची प्रमुख भूमिका आहे आणि दोन्ही भूमिका एकमेकांच्या बरोबर विरुद्ध आहेत आणि यातूनच ती उत्कृष्ट अभिनेत्री आहे हे कळतं.

ग्योयथं इन्स्टिट्यूट मॅक्स म्युलर भवन पुणे च्या सहयोगाने ख्रिस्तो सगोर लिखित, सपन सारन दिग्दर्शित 'लव्ह यू' हे नाटक १४ फेब्रुवारी ला 'The Base' इथे पाहिलं. हे मूळ नाटक ख्रिस्तो सगोर याने जर्मन मध्ये लिहिलं आहे त्याचं नाव आहे 'Ich lieb dich'. या नाटकाला २०१९ चं Kinderstckepreis हा सन्मान सुद्धा मिळालं. 'Ich liebe dich' चा मराठी अनुवाद मृण्मयी शिवापुरकर हिने केला आहे.

'लव्ह यू' हे १२ वर्षांच्या युलीयान आणि लियाच्याप्रेमाची धमाल दाखवणारं नाटक आहे.

---

युलियानला लिया आवडत असते पण लियाला युलियान नाही. ते म्हणतात:

Julian: Lea, ich liebe dich.
Lea: Ich dich nicht
Julian: Warum nicht?
Lea: Ist so...!
Julian: Ja, ahet warum nicht?

Lea: Dass weiss ich nicht

म्हणजेच

युलियान: लिया, मी तुझ्यावर प्रेम करतो
लिया: पण मी नाही
युलियान: का?
लिया: असंच
युलियान: अगं पण का?
लिया: ते मला माहित नाही, ते तू बघ.

अशा या हलक्या फुलक्या, निरागस अशा संवादातच या नाटकाचं यश आहे.

युलियानच्या आई-वडिलांनी वेगळं व्हायचं ठरवलं असतं. युलियान आणि लियाला प्रश्न पडलेला असतो की, प्रेम म्हणजे नक्की असतं तरी काय? आणि ते मधूनच असं थांबतं तरी कसं? केव्हा आणि कसं कळतं की आपण प्रेमात पडलोय? प्रेमाचे प्रकार असतात? प्रेमाच्या विरुद्धार्थी काय असतं? राग?, भीती? असे अनेक प्रश्न पडल्यामुळे ते आपल्या घरच्या व्यक्तींची उदाहरणं डोळ्यांसमोर ठेवतात, अनेक वस्तूंचा विचार करतात आणि त्यातून प्रेमाचा. लहानपणापासून आपण ज्यांवर प्रेम केलंय याची त्यांना आठवण होते. जसं की: युलियानची गिनी पिग: मुप्पी (हे नाव युलियानने ठेवलं असतं आणि नंतर त्याला कळतं की 'मुप्पी' या नाव मूटी आणि पापी याने बनलंय-मूटी म्हणजे जर्मन भाषेत आई आणि पापी हे लाडात तरींशीला म्हणजे बाबांना केलेलं संबोधन आहे) तर युलियानचा मुप्पी, त्या दोघांचे आई-बाबा, लियाचे आजी-आजोबा, लेमन आइसक्रिम, चेस्टन्ट्स, वगैरे या गोष्टी आठवत ते विचार करतात की, यापैकी कोणतं प्रेम हे नेहमी टिकणारं होतं?

लियाच्या आजी-आजोबांच्या लग्नाला तर ४१ वर्ष झाले असतात. या प्रश्नांची उत्तरं मिळवायला ते आजी आजोबांकडे जातात. लियाचे आजोबा म्हणतात- हे बघ बाळा युलियान, जेव्हा आपल्याला वाटतं की आपण काहीतरी मिळवलंय तेव्हा ते असं आपल्या बोटांतून निसटून जातं. पण त्या वेळी लिया आणि युलियानला कुठेतरी खात्री पटते की, आजी-आजोबा तर एवढे वर्ष एकत्र आहेत तर प्रेम जास्त काळ असतं. पण त्याला लहानपणी लेमन आइसक्रिम आवडत असतं आणि आता कुठलंतरी दुसरंच. त्यात त्याचे आई-बाबा वेगळे होणार असतात; मुप्पी, ज्यावर त्याने प्रेम केलं असतं त्याला किडनीचा आजार होतो आणि तो जगू शकत नाही; चेस्टन्ट्स त्यांच्या कोणत्या रूपात त्याला आवडतात हे कळत नाही आणि परत अनेक प्रश्न आणि प्रश्न. असे अनेक अफलातून प्रसंग प्रेक्षकांसमोर ठेवत हे नाटक पुढे जातं.

दोनच पात्र किमान ६-७ भूमिका करतात आणि ते सुद्धा इतक्या सहजपणे की पापणी मिटेपर्यंत पात्र बदललेलं असतं. पर्ण पेठे आणि शिवराज वायचळ यांचा अभिनय आणि एनर्जी बघून शेवटच्या रांगेत बसलेल्या रसिकांपर्यंत ती सगळी पात्रं संपूर्णपणे पोहोचतात आणि ऊर्जा, उत्साह मिळतो. मध्ये मध्ये पात्र बदलताना पर्ण ही आजीची भूमिका तर करतेच पण ती आजोबांची, युलियानच्या बाबांची आणि चक्क मुप्पीची सुद्धा तितक्याच समर्थपणे वठवते. शिवराजने केलेली आजोबांची भूमिका जशी लक्षात राहते, तशीच आजीची आणि आईची सुद्धा!

वेगवेगळ्या रंगाची शाई लागलेला त्या दोघांचा पांढरा शर्ट, पर्णचे लियाला साजेसे असे केस, संपूर्ण वेळ दोघांच्याही हातात असलेली वही आणि नेपथ्यात फक्त बाकांच्या ३ रांगा. हे एवढंच असलं तरीपण अनेक भूमिका, अनेक ठिकाणं- जसं की घर, शाळेतला बाक, आजी-आजोबांचा झोका, चेस्टन्ट्स असलेली बाग हे सगळं प्रेक्षकांना समोर दिसतं.

रंगमंचावरची धमाल बघून प्रेक्षक पूर्णपणे शिवराज आणि पर्णला विसरून युलियान-लियाच्या मस्तीत आणि निरागसपणात गुंगून जातात. एका बाजूला सुरुवातीपासून शेवटपर्यंत हसवतात आणि वेळोवेळी विचार सुद्धा करायला लावतात.

**- मधुमती जयंत गौरकर**
तृतीय वर्ष कला,
जर्मन भाषा विभाग,
फर्ग्युसन महाविद्यालय पुणे.

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहे.**

**- संपादक**

(पृष्ठ क्र.१६ वरून - **तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल**)

झालं की मग सगळ्यांमध्ये विठ्ठलच दिसतो. नामदेवांना त्यांचा विठ्ठल सापडला आहे. मग त्यांचा विठ्ठलशोध थांबतो. आता शोधायचं कुठे आणि कोणाला? आता दिसेल तो विठ्ठलच, भेटेल तो विठ्ठलच आणि करेल तो विठ्ठलच. बोलावा विठ्ठल, पाहावा विठ्ठल, करावा विठ्ठल अशी अवस्था. जीवीचे जीवन विठ्ठल, जीवभाव विठ्ठल. हा भीतरी पालटू'- आत झालेला बदल आहे. आणि असं झाल्यावर मग कळिकाळाचा काय पाड असणार? विठ्ठल सापडल्यावर संकट ओढवणारच नाही.

नामदेवांची काय विलक्षण अनुभूती आहे! त्यांची अशी विठ्ठलमय अवस्था म्हणजे आपल्यासाठी विजेचा लोळच. सगळं हिणकस, क्षुद्र, स्वार्थी क्षणात जाळून टाकून विठ्ठलमय करणारा अनुभव. असा अनुभव घेतलेल्या नामदेवांचे शब्द आपल्यासाठी आनंदनिधानच आहेत. उजेडाचा केवढा लख्ख वारसा आहे हा. नामदेवांचे चरणी नमन!!

तीर्थ विठ्ठल, क्षेत्र विठ्ठल ।
देव विठ्ठल, देवपूजा विठ्ठल ।।१।।

माता विठ्ठल, पिता विठ्ठल ।
बंधु विठ्ठल, गोत्र विठ्ठल ।।२।।

गुरू विठ्ठल, गुरुदेवता विठ्ठल ।
निधान विठ्ठल, निरंतर विठ्ठल ।।३।।

नामा म्हणे मज विठ्ठल सापडला ।
म्हणुनि कळिकाळा पाड नाही ।।४।।

**- डॉ. आनंद कुलकर्णी**
इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, वारुलवाडी, नारायणगाव
ता. जुन्नर, जि. पुणे- ४१०५०४

•••

# माणिकगड : वनराईत हरवलेली एक ऐतिहासिक वास्तू

*चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यात गडचांदूर गावाजवळ माणिकगड हा किल्ला वसला आहे. या गडाचे वर्णन या लेखात केले आहे – संपादक*

महाराष्ट्रात गड, किल्ले मोठ्या प्रमाणावर आहेत. परंतु त्यातील बरेचसे सह्याद्रीच्या कुशीत वसलेले आहेत. सातपुड्याच्या रांगा किंवा गोंडवनातील जंगल या परिसरात अगदी मोजके असेच गड आहेत. त्यातील एका गडाला भेट देण्याची संधी मला मिळाली. त्याचे नाव माणिकगड. चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यात गडचांदूर गावाजवळ हा किल्ला वसला आहे. या परिसरात चुनखडीचे साठे आहेत. त्याचा उपयोग करून घेण्यासाठी सिमेंट बनविण्याचे कारखाने या परिसरात उभारण्यात आले आहेत. हा परिसर वनराईने समृद्ध आहे. याच वनराईत गडचांदूरपासून साधारणपणे १५ किलोमीटरवर जिवतीला जाणाऱ्या रस्त्यावर हा किल्ला आहे. त्याची देखभाल मध्य चांदा वनविभाग करते. किल्ला पाहायला येणाऱ्या प्रत्येक पर्यटकासाठी वन विभाग दहा रुपयांचे शुल्क आकारते. प्रवेश तिकीट घेऊन पायवाटेने आपण चालू लागलो की, लवकरच आपण किल्ल्याच्या प्रवेशद्वारापाशी पोहोचतो.



**प्रवेशद्वार**

प्रवेशद्वार दगडाचे बांधले असून ते चांगल्या अवस्थेत आहे. जवळच एका बंदुकीचे अवशेष पडले आहेत. पहिल्या प्रवेशद्वारातून आत शिरल्यावर आपल्याला जिने चढून वर जावे लागते. तिथे आपल्याला किल्ल्याच्या भव्यतेची जाणीव होते. किल्ल्यासाठी दगडाचे उंच आणि मजबूत कामकाज केले आहे. भिंतीच्या आत वाढलेल्या महाकाय वनस्पतीमुळे ते आणखीनच शोभून दिसते. ते बघत आपण पायऱ्या चढून वर गेलो की लवकरच दुसऱ्या प्रवेशद्वाराजवळ पोहोचतो. हे प्रवेशद्वार फारच अरुंद आहे. त्यातून पुढे गेल्यावर एक अरुंद पायवाट लागते. दोन उंच कड्यांच्या मधून ही वाट जाते. या वाटेवर चालत राहिलो की आपण लवकरच सपाट जागेवर येतो. तेथे एक दिशादर्शक फलक लावलेला असून त्यावर किल्ल्यातील महत्त्वाची ठिकाणे आणि त्यांची अंतरे यांची माहिती दिलेली आहे.



**दिशादर्शक फलक**

दिशादर्शक फलकावर दिलेल्या माहितीनुसार आम्ही किल्ल्याच्या किनाऱ्याने चालू लागलो. हे करीत

रूढी ही प्रेमाच्या मार्गातली मोठी धोंड असते.

असताना डोंगराच्या कडेचा उपयोग करून किल्ला बांधला असल्याचे लक्षात येते. किल्ल्याच्या पलीकडे दरी असून ती संपूर्णपणे झाडांनी आच्छादिलेली आहे. थोड्याच अंतरावर आम्हांला एक टेहळणी बुरूज दिसला. उन्हात चालत असल्याने आम्हांला थकवा जाणवत होताच. शीण घालवण्यासाठी म्हणून आम्ही टेहळणी बुरुजात प्रवेश केला. तोच हवेच्या गार झुळकेने आमचे स्वागत केले. टेहेळणी बुरुजाला जी खिडकी आहे, तिथून हवेचा झोत वेगाने आत शिरतो. त्यामुळे आजूबाजूचे वातावरण जरी तापलेले असले, तरी बुरुजाच्या आत गार वाटते.



**टेहळणी बुरूज**

किल्ल्याचा परिसर खूप मोठा आहे. तो पाहण्यासाठी आमची पायपीट परत सुरू झाली. थोड्याच अंतरावर आम्हांला आणखी एक दगडाचे बांधकाम दिसले. त्याला टहाळकी बुरूज असे नाव असल्याचे तेथील फलकांवरून लक्षात आले. टेहळणी बुरुजाप्रमाणेच येथेदेखील वाऱ्याचा चांगला झोत येतो. या इमारतीला असलेल्या खिडक्या मोठ्या असल्याने दूरवरचे दृश्य स्पष्ट दिसते. या इमारतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वर जाण्यासाठी तिथे जिना आहे. वरून दूरवरच्या परिसरावर नजर टाकता येते. उन्हाळा असूनदेखील हा परिसर विलोभनीय दिसत होता. पावसाळ्यात तो किती सुंदर दिसत असेल याची कल्पना करीत आम्ही त्या बुरुजाचा निरोप घेतला.



**टहाळकी बुरूज**

तिथे असलेल्या सूचनेनुसार आम्ही पुढे चालत गेलो. पुढचे ठिकाण होते पाताळकाट विहीर. ही विहीर दोन डोंगरांच्या मध्ये असलेल्या दरीत आहे. त्यासाठी अनेक पायऱ्या उतरून खाली जावे लागते. विहीर फारशी चांगल्या अवस्थेत नाही. परंतु आजूबाजूचा परिसर चांगला विकसित केला आहे. तिथे असलेल्या गर्द झाडीमुळे उन्हाची झळ मुळीच जाणवत नाही.



**पाताळकाट विहीर**

आम्हांला दिशादर्शक फलकावर जी माहिती मिळाली, त्यानुसार आणखी बरीच ठिकाणे पाहायची राहिली होती. त्यात समावेश होता तो घोडा पार्क, वॉच टॉवर, निजामगोंदी गेट, गणेशमूर्ती, राणी महाल आणि राणी तलाव. ही सगळी ठिकाणे एकमेकांपासून दूर होती. त्यातल्यात्यात राणी महाल आणि तलाव एकमेकांच्या जवळ असल्याचे आमच्या लक्षात आले. म्हणून आम्ही आमचा मोर्चा तिकडे वळविला. या स्थळाक़डे जाणे तसे जिकिरीचे आहे. रस्ता अरुंद असून उतरंड आहे. चालताना घसरून पडण्याची भीती असते. एवढा त्रास घेऊन तिथे पोहोचल्यावर मात्र समाधान वाटते.



**राणी महाल**

किल्ल्याचा फेरफटका मारून आम्ही परत वनविभागाच्या कार्यालयाजवळ आलो, तेव्हा आम्हांला विष्णू मंदिराची पाटी दिसली. त्या दिशेने पायऱ्या उतरून आम्ही खाली गेलो तर आम्हांला दगडांनी बांधलेले एक सुंदर मंदिर दिसले. या मंदिराच्या दगडावर सुंदर असे कोरीवकाम केलेले आहे. ते उठून दिसावे यासाठी त्यावर रंग लावला आहे.

माणिकगड किल्ल्याला दिलेली भेट अविस्मरणीय अशीच होती. नाग वंशीय राजाने या किल्ल्याचे ९ व्या



**विष्णू मंदिर**

बांधकाम शतकात केल्याची नोंद आहे. मागील एक हजाराहून जास्त वर्षे ऊन-पावसात असल्याने अनेक ठिकाणी पडझड झाली असल्याचे दिसते. विशेष आनंदाची बाब अशी की, वन विभागाने अनेक ठिकाणी दुरुस्ती केलेली आहे. जागोजागी निवाऱ्यासाठी मंडप बांधले आहेत. तसेच आजूबाजूचे निरीक्षण करण्यासाठी पगोड्याच्या आकाराचे बांधकाम केले आहे. गर्द वनराईने नटलेले हे ठिकाण आहे. वनस्पती शास्त्राच्या अभ्यासकांना ही भेट म्हणजे पर्वणीच ठरेल. ऐन उन्हाळ्यातदेखील सर्वत्र हिरवळ दिसते. पावसाळ्यात हा परिसर किती नयनरम्य असेल याची कल्पनाच करवत नाही. एकदा तरी भेट द्यावे असेच हे ऐतिहासिक ठिकाण आहे.



**पगोडा**

**- सौ. शोभा सुधाकर आगरकर**

# परिसर वार्ता

**- संकलित**

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**वार्षिक बक्षीस समारंभ**

बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयाचा वार्षिक बक्षीस समारंभ १० मे २०२२ रोजी पाणिनी सभागृहात संपन्न झाला. कु. अमृता ठोंबरे या विद्यार्थिनीने केलेल्या इशस्तवनाने या कार्यक्रमाची सुरुवात झाली. या वेळी डॉ. विजय बेडेकर, कार्याध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ, प्रमुख पाहुणे व डॉ. नितीन जोशी, संचालक, डॉ. व्ही. एन. ब्रिम्स हे विशेष अतिथी म्हणून लाभले होते.

डॉ. उर्मिला कुमावत, साहाय्यक प्राध्यापक, वनस्पती शास्त्र विभाग यांनी केलेल्या प्रास्ताविकानंतर डॉ. मोजेस कोलेट, प्राचार्य, बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय ठाणे यांनी प्राचार्यांचा अहवाल सादर केला. ज्यामध्ये २०२१-२०२२ या संपूर्ण शैक्षणिक वर्षात ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेण्यात आलेले विविध कार्यक्रम, विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व, त्यांना मिळालेली पारितोषिके, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मिळवलेले यश, माजी विद्यार्थ्यांनी केलेली कामगिरी इत्यादी सर्वांचा आढावा होता.

त्यानंतर २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षाचे वार्षिक 'संयुजा' याचे प्रकाशन करण्यात आले. संयुजा वार्षिकाच्या समन्वयक डॉ. उर्मिला कुमावत यांनी संयुजामध्ये घडवलेले बदल, नव्याने सुरू केलेली सदरे, विविध स्पर्धा यांबद्दल संयुजा वार्षिक प्रकाशित करताना आलेले अनुभव मांडले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. विजय बेडेकर व विशेष अतिथी डॉ. नितीन जोशी, सौ. सुमेधा बेडेकर यांच्या हस्ते संयुजा प्रकाशन सोहळा संपन्न झाला.



त्यानंतर डॉ. बेडेकर यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना स्वयंशिस्त कशी महत्त्वाची आहे याबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. नितीन जोशी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीकरता शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर महाविद्यालयातील विविध स्पर्धांमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल देखील त्यांचा सत्कार करण्यात आला.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. उर्मिला कुमावत यांनी केले, तर डॉ. पूनम कुर्वे यांनी या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले व पसायदानाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

**ग्रंथालय विभागातर्फे महात्मा बसवेश्वर जयंती, स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती साजरी**

ग्रंथालय विभागातर्फे ३ मे २०२२ रोजी महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला, तसेच त्यांच्यावरील माहितीचे प्रदर्शन भरवण्यात आले.

२८ मे २०२२ रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावरील पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोजेस कोलेट यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी सावरकरांच्या एकूण कार्याचा आढावा थोडक्यात सादर केला.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या २९७ व्या जयंती निमित्त ३१ मे २०२२ रोजी अहिल्याबाई होळकर यांच्यावरील पुस्तकांचे व माहितीचे प्रदर्शन ग्रंथालयात भरवण्यात आले.



**महात्मा बसवेश्वर जयंती**



**स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर जयंती**

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

१) गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक नांदेड (इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी विभाग) यांनी दिनांक ११ मे २०२२ रोजी राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा 'Ethical Hacking and Cyber Security' या विषयावर आयोजित केली. विद्या प्रसारक मंडळाच्या इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी विभागातील सिद्धांत भोई हा विद्यार्थी प्रथम क्रमांक मिळवून विजेता ठरला.

२) गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक मुंबई व MSBTE यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय 'Online Technical Project and Paper Presentation Competition' दिनांक १७ व १८ मे २०२२ रोजी आयोजित केली. विद्या प्रसारक मंडळाच्या इन्स्ट्र्युमेन्टेशन विभागातील तृतीय वर्षातील श्रेयस आव्हाड, सौरभ दुबे, प्रेम बाऊसकर, तुषार शर्मा यांना 'Reconnaissance and Surveiliance arone with Beacon' या प्रकल्पाला द्वितीय पारितोषिक मिळाले.

३) विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील (Institution Innovation Council (IIC 4.0)) यांनी दोन दिवसीय 'I & E Exposure cum Training Program' Mentor - Mentee प्रकल्प २०२१-२२ च्या अंतर्गत २० व २१ मे २०२२ रोजी कार्यक्रम आयोजित केला.

**प्रशिक्षणार्थी संस्था :**

१) Institute of Management & Entreprenurship Development, Pune.

२) Yes's International Institute of Management Science, Pune

३) Sant Gajanan Maharaj Rural Polytechnic, Mahagaon

४) Bharti Vidyapeeth College of Engineering, Kolhapur

५) SES Saraswati Institute of Technology, Navi Mumbai सदर कार्यक्रमात पुढील प्रशिक्षण देण्यात आले -

१) टी.बी.आय (SPCOE) मुंबई व SINE, IIT Mumbai या टेक्नॉलॉजी बिझीनेस इन्क्युबेशन केंद्राला भेट.

२) इन्क्युबेशन फॅसिलिटी क्रिएशन व स्टार्टअप मेन्टोरिंग या विषयावर प्रशिक्षण आयोजित केले.

३) IPR / Drafting of Patent application या विषयावर प्रशिक्षण.

सदर कार्यक्रमात डॉ. डी. के. नायक (अध्यक्ष), प्रो. तुषार मोहिते पाटील (निमंत्रक) व डॉ. उषा राघवन (President) म्हणून कार्य पाहिले.

४) कॉम्प्युटर विभागाच्या सौ. गौतमी पुजारे यांनी दिनांक २१ मे २०२२ रोजी 'How to Build an Effective Placement Cell' या प्रशिक्षण कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली. सदर कार्यक्रम Testbook Skilled Campus Program ने आयोजित केला.

५) इन्स्ट्र्युमेन्टेशन विभाग - (सौ. वैशाली जोशी, विभाग प्रमुख)

६ जून २०२२ रोजी 'Sulzer Company' व इन्स्ट्र्युमेन्टेशन विभागाच्या सहयोगाने पर्यावरण दिन साजरा केला.

Sulzer ही Multi National Company आहे; जी सातत्याने पर्यावरण संदर्भात जागृत आहे. ती आपल्या Customers ला पर्यावरणपूरक उपाय व भविष्यासाठी, पर्यावरणासाठी केलेल्या उपाय योजनेसाठी अथक कार्यरत आहे.

Sulzer कंपनीतर्फे श्री. अनूप कुमार (CT TFS INMEQESH Manager) व श्री. सचीन कालमस्ते (Office Assistant) यांनी मार्गदर्शन केले. पर्यावरणाला सांभाळण्यासाठी श्री. अनुप कुमार यांनी पर्यावरणाला उद्भवणारे धोके जसे वायू प्रदूषण, green house gasesd याबाबतीत विस्तृतपणे मार्गदर्शन केले. वृक्षारोपण व त्यांचे संवर्धन किती महत्त्वाचे आहे हे त्यांनी आपल्या व्याख्यानातून व्यक्त केले. श्री. अनुप कुमार यांनी काही वृक्ष रोपांचे वाटप केले. विद्यार्थ्यांनी या वृक्ष रोपांची लागवड करून कॅम्पस हरित करण्यासाठी मदत केली.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

**मे २०२२ मधील कार्यक्रम / वार्ता**

१ मे : एमएमएस विपणन मार्केटिंग शाखेच्या विद्यार्थ्यांची नियुक्ती

| विद्यार्थ्याचे नाव | कंपनीचे नाव | वार्षिक वेतन | नियुक्ती समन्वयक |
|---|---|---|---|
| रक्षिता गावडे | आयडीएफसी फर्स्ट बँक | ५ लाख | श्रीमती स्वेता नायर |
| आशी राजगोर | हिंदुस्तान टाईम्स | ४ लाख | श्री. अमित नांबियार |

६ मे : डॉ. नितीन जोशी यांना उच्च शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या अमूल्य आणि अनुकरणीय योगदानाबद्दल, आर्डोर कॉम मेडिया (Ardor Comm Media) कडून प्रशंसा प्रमाणपत्र मिळाले.



८ मे : डॉ. स्मिता जपे यांनी जर्नल क्लबमध्ये ‘ड्राइव्हर्स ऑफ सॉव्हरिअन बॉण्ड यिल्ड इन इंडिया’ या विषयावर एक शोधनिबंध सादर केला.

१३ मे : डॉ. नितीन जोशी यांना एअरबस (AIRBUS) कडून मार्गदर्शनासाठी कृतज्ञता पत्र मिळाले.

२० मे : एमएमएस विपणन मार्केटिंग शाखेच्या विद्यार्थ्यांची नियुक्ती

| विद्यार्थ्यांचे नाव | कंपनीचे नाव | वार्षिक वेतन | नियुक्ती समन्वयक |
|---|---|---|---|
| स्वराली घोसाळकर | एचडीएफसी एम एफ | ३.२० लाख | प्रा. मुग्धा भडकमकर |
| शहेजाद आलम आणि अभिषेक केशरवानी | ग्लोबॉप (GLOBEOP) | ४ लाख | प्रा. प्रवीण नारंग |

२४ मे : प्रा. विभूती सावे यांनी २७ एप्रिल – १७ मे २०२२ या कालावधीत ‘खुल्या, दूरस्थ आणि लवचीक शिक्षणासाठी मूल्यांकन कौशल्य’ या विषयावरील अभ्यासक्रम पूर्ण करून मूल्यांकनकर्ता पदक मिळविले.







२५ मे : प्रा. कृणाल के. पुंजानी यांनी ऑस्ट्रेलियातील मॅक्वेरी युनिव्हर्सिटीच्या, मॅक्वेरी बिझनेस स्कूल तर्फे आयोजित केलेल्या ‘हाय इम्पॅक्ट रिसर्च’ कार्यशाळेमध्ये सहभाग घेतला.




२७ मे : डॉ. नितीन जोशी यांना सेंट फ्रान्सिस इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे विषय तज्ज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले.

२९ मे : डॉ. नितीन जोशी यांना बुर्हानी महाविद्यालयातर्फे अतिथी वक्ता म्हणून आमंत्रित करण्यात आले.

३१ मे : प्रा. महेश भानुशाली यांनी एमएमएस., विपणन शाखेचा विद्यार्थी श्री. अनिकेत थोरात याला बैजूस (BYJUS) मध्ये १० लाख वार्षिक उत्पन्नाची रोजगार संधी मिळवून दिली.

डॉ. कांचन अक्षय यांनी डॉ. व्ही. एन. ब्रिम्स आणि केंब्रिज असेसमेंट इंग्लिश यांच्यात समन्वय साधला आणि संयुक्त करार यशस्वीरित्या पूर्ण केला. या करारामुळे विद्यार्थ्यांना केंब्रिजकडून संभाषण आणि मुलाखत

कौशल्यांचे प्रशिक्षण मिळण्यास मदत होईल. कार्यक्रम पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना केंब्रिजकडून एक प्रमाणपत्र मिळेल, जे त्यांना रोजगार नियुक्तीसाठी मदतीचे ठरेल.

डॉ. स्मिता जपे यांनी इंडियन जर्नल ऑफ फायनान्स अँड बँकिंग (IJFB), या ए बी डी सी सूचिबद्ध नियतकालिकांसाठी 'कस्टमर ट्रस्ट ऑन ई-बँकिंग ऑन कोविड-१९ सिच्युएशन इन बांग्लादेश' या शीर्षकाच्या शोधनिबंधाचे समीक्षण केले.

**कर्मचाऱ्यांची कामगिरी**

श्री. स्वप्नील नाखवा याने २५ मीटर फ्री स्टाइल ओपन जलतरण (स्विमिंग) स्पर्धेमध्ये सहभागी होऊन प्रथम क्रमांक पटकावला.







श्री. दर्शन कोळी 'वर्ल्ड ऑफ हितार्थ' हे यू ट्यूब चॅनल चालवतात.

लिंक : https://www.youtube.com/watch?v=5evo_wJ0m-w






•••

दिशा नियमित वाचा.

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय)**

पालकत्वाची जबाबदारी संपते असे अनेक सुशिक्षित पालक समजत असतात. ते पूर्णपणे चुकीचे आहे. अहमदाबादमध्ये एक शाळा आहे. ज्या मुलाला किंवा मुलीला त्या शाळेत प्रवेश हवा आहे, त्यांच्या पालकांशी शाळाचालक आधी चर्चा करतात. मुलांच्या शिक्षणासाठी वेळ देणे अत्यावश्यक आहे हे त्यांना समजावून देतात. जे पालक 'आम्हांला वेळ नाही' असे सांगतात, त्यांच्या पाल्यांना त्या शाळेत प्रवेश नाकारला जातो.

आपल्या पाल्यांना सुखसुविधा उपलब्ध करून देणे एवढीच आपली जबाबदारी आहे असे अनेक पालकांना वाटते पण ते चुकीचे आहे. याउलट मुलांना आपल्या पायावर उभे करणे ही त्यांची जबाबदारी असते. या संदर्भात माझा एक अनुभव सांगण्यासारखा आहे. साधारणपणे दोन दशकांपूर्वी मी अमेरिकेला गेलो असताना एका प्राध्यापकाच्या घरी राहिलो. या प्राध्यापकाचा मुलगा सकाळी उठून पेपर टाकायला जातो हे पाहून मला आश्चर्य वाटले. त्यावर त्यांनी मला सांगितले की, हे करण्याने त्याला कामाचा तर अनुभव येतोच त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे वेळ आणि पैसा यांचेही महत्त्व कळते. किती मोठा विचार आहे हा! त्यामुळेच त्यांची मुले लवकर आपल्या पायावर उभी राहतात आणि स्वतः निर्णय घेऊ लागतात. पाश्चिमात्य देशांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिथे असलेली वस्तुसंग्रहालये आणि वाचनालये. ही दोन्ही ठिकाणे समृद्ध असल्याने मुलांच्या ज्ञानात भर पडत जाते. ग्रंथालये तसेच संग्रहालयांची संख्या आपल्याकडे तुलनेने कमी आहेत. परंतु जी आहेत, त्यांचा पुरेसा वापर होताना दिसत नाही. शैक्षणिक सहली काढून ही ठिकाणे शाळा आपल्या मुलांना दाखवतील अशी आशा बाळगणे चूक आहे. या ठिकाणांना पालकांनी आपल्या पाल्यांसोबत नियमितपणे भेट देणे आवश्यक आहे.

शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात मुलांना नियमित कालावधीनंतर सुट्टी मिळते. या सुट्टीचा सदुपयोग करणे आवश्यक असते. एका शैक्षणिक प्रकल्पात असे लक्षात आले की, सुट्टी कशी घालवावी याची योजना अनेक मुलांकडे आणि त्यांच्या पालकांकडे नसते. अशा काही मुलांना सुट्टीत करता येतील अशी काही कामे सांगण्यात आली. त्यामध्ये समावेश होता हर्बेरियम बनविण्याचा. या कृतीचा अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला. सुट्टी संपल्यावर मुलांनी अनेक वनस्पतींचे हर्बेरियम आणून दिले. दुसरे काम होते, सर्वेक्षण करण्याचे. या कामालादेखील उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भाज्यांचे भाव, चाळीतील लोकांची शैक्षणिक पात्रता, वर्तमानपत्रांचा खप अशा अनेक विषयांवर विद्यार्थ्यांनी सर्वेक्षण केले. तिसरा विषय होता मुलाखत घेण्याचा. प्रकल्पात सहभागी असलेल्या मुलांनी समाजातील वेगवेगळ्या लोकांच्या मुलाखती घेतल्या. आपण विचारलेले प्रश्न, त्याला आलेले उत्तर त्यांनी पद्धतशीरपणे लिहून काढले. या प्रकल्पात असे लक्षात आले की, सुट्टीला दिशा देऊन विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित करता येते. त्यादृष्टीने पालकांनी विचार करावा असे आवाहन मी करू इच्छितो.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••

जगात असे एकच न्यायालय आहे की, तेथे सर्व गुन्हे माफ होतात, ते म्हणजे आईचे प्रेम.

Vidya Prasarak Mandal, Thane's

# Maharshi Parshuram College of Engineering, Velneshwar

■ Recognized by **Govt. of Maharashtra** ■ Approved by **AICTE, New Delhi** ■ Affiliated to **University of Mumbai**




## Courses offered

- Civil Engineering
- Electrical Engineering
- Electronics and Telecommunication Engineering
- Instrumentation Engineering
- Mechanical Engineering

## Infrastructure & Academic facilities

- Standard hostel facility with attached bathrooms
- Campus having academic building, student hostels, teacher quarters, gymkhana, utility, Class rooms & Laboratories with audio visual facilities
- Highly qualified teaching faculty & supporting staff as per AICTE norms
- Best quality canteen & mess with Hygienic food
- Stationary shop, laundry and basic needs facility in the campus
- High speed Internet access with Wi-fi system
- Guest house for visitors and parents in the campus
- Health care / Indoor games facility in campus
- 24 hours electronic security system

*Education on the lap of Nature ...*

**VPMMPCOE : At : Velneshwar, Hedvi - Guhagar Road,**
**Taluka : Guhagar, District : Ratnagiri, Maharashtra - 415729, INDIA.**
**Tel. No. : 9324510629, 9004690479**
**E-mail : mpcoe@vpmmpcoe.org, mpcoe@vpmthane.org**
**URL : www.vpmmpcoe.org**

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| **सभागृहाचे नाव** | **ठिकाण** | **आसन क्षमता** |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.